CCTV CAMERA
बिघडला आहे का?
फक्त एकच कॉल
ISO 9001 : 2015 Certified
Mandar MuLay
Cell : 98222 94622 | 94220 87757
www.mandarmulay.com



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँड मार्बल इंडस्ट्रिज

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. ०९.०९.२०२६ | अंक नं. १३७ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

चलो दुबई
खरेदी सोन्याची, होईल भाग्याची..
सोने-चांदीच्या खरेदीवर स्क्रॅचकार्डव्दारे
जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स
₹ 50000/- सोने खरेदीवर
₹ 20000/- चांदी खरेदीवर
₹ 5000/- भिशी योजनेत सहभागी व्हा.
₹ 5000/- फॉर्मिंग ज्वेलरीच्या खरेदीवर
स्क्रॅचकार्डव्दारे जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच
मजुरीही सर्वात कमी.
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु
पाहिजेत
सुवर्णक्षेत्रात करिअर करण्याची सुवर्णसंधी.
कॅशियर जागा : 2 (पुरुष)
कामाची वेळ : सकाळी 10 ते रात्री 9 पर्यंत
कुठल्याही क्षेत्रातील अनुभवींना प्राधान्य.
पगार : 20000/- ते 21000/-
पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा
इच्छुक उमेदवारांनी सविस्तर अर्ज बायोडाटासह सोमवार ते शनिवार सकाळी 11 ते 2 यावेळेत समक्ष भेटावे.







बैल पोळ्यानिमित्त बाजारपेठ सजावटीच्या साहित्याने सजली असून गंज बाजार परिसरातील हे छायाचित्र.

## कोयता आणि सत्तूर घेऊन दहशत माजवणाऱ्या दोन तरुणांना अटक

नगर - शहरातील स्वस्तिक चौक परिसरात भरदिवसा घातक शस्त्रे बाळगून दहशत निर्माण करणाऱ्या दोन तरुणांना कोतवाली पोलिसांनी रंगेहात पकडले आहे. ही कारवाई ८ सप्टेंबर रोजी दुपारी सव्वातीन वाजेच्या सुमारास आशा भेळ सेंटर शेजारी करण्यात आली.

या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल रमेश राम शिंदे (वय ३५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी नितीन लक्ष्मण शिंदे (वय १९, रा. पुणे बस स्थानकासमोर, अहिल्यानगर) आणि सुदेश आनंद बोठे (वय २०, रा. गणेशवाडी, आनंद ऋषीजी रुग्णालयामागे, अहिल्यानगर) हे दोघे संशयितरीत्या फिरताना आढळले.

तपासणीदरम्यान या आरोपींकडून ५०० रुपये किमतीचा काळ्या रंगाची रबरी मूठ असलेला धारदार सुरा, ५०० रुपये किमतीचा लाकडी मूठ असलेला लोखंडी सत्तूर आणि २० हजार रुपये किमतीची काळ्या रंगाची जुनी दुचाकी (क्रमांक एमएच १६ डी ०८२८) असा एकूण २१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

परिसरात विनापरवाना घातक शस्त्रे बाळगून लोकांमध्ये भीतीचे वातावरण तयार केल्यामुळे दोघांविरुद्ध शस्त्र कायद्यानुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार बाळकृष्ण दौंड या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# पेट्रोलपंप देण्याच्या नावाखाली ८४ लाखांची फसवणूक

### दोघांना उत्तर प्रदेशात ठोकल्या बेड्या

नगर - जिओ कंपनीचा पेट्रोलपंप आणि परवाना मिळवून देण्याच्या नावाखाली एका नागरिकाची तब्बल ८४ लाख ५३ हजार रुपयांची फसवणूक करणाऱ्या दोन आंतरराज्य भामट्यांना अहिल्यानगरच्या सायबर पोलिसांनी उत्तर प्रदेशातून शिताफीने ताब्यात घेतले. आकाश सिंह ऊर्फ सौरभ अग्रवाल आणि निलेश कुमार द्विवेदी अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

तक्रारदार फिर्यादी यांना 'सौरभ अग्रवाल' नावाच्या व्यक्तीने फोन करून पेट्रोलपंपाची डीलरशिप देण्याचे आमिष दाखवले होते. त्यानंतर प्रोसेसिंग फी व इतर खर्चांच्या नावाखाली फिर्यादीकडून ३१ ऑक्टोबर २०२५ ते ८ जुलै २०२६ या कालावधीत वेळोवेळी एकूण ८४ लाख ५३ हजार रुपये उकळून आर्थिक फसवणूक करण्यात आली. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच फिर्यादीने सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून गुन्हा दाखल करून तपास सुरु करण्यात आला.



पेट्रोलपंप देण्याच्या नावाखाली ८४ लाखांची फसवणूक करणाऱ्या दोघांना पकडून आणल्यानंतर त्यांच्या समवेत सायबर पोलीस ठाण्याचे पथक.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबुर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या पथकाने तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढला.

तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक सुदाम काकडे, पोलीस अंमलदार उमेश खेडकर, रावसाहेब हुसळे आणि शैलेश गोमसाळे यांनी थेट उत्तर प्रदेशातील बांदा जिल्ह्यात जाऊन बनावट नावाने भाड्याने राहणाऱ्या या दोन्ही भामट्यांना सापळा रचून ताब्यात घेतले. या संपूर्ण कारवाईत पोलीस अंमलदार भालसिंग, सविता खताळ, दिपाली घोडके, सविता हिंगे, ज्योती काळे, रवींद्र कर्डिले, प्रशांत जाधव, आप्पा हिंगे आणि प्रशांत राठोड यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली. आरोपींवर इतर राज्यांतही गुन्हे दाखल असून त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले आहे.

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे.
आकर्षक पगार
भेटा : कोहिनूरसमोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

# बेकायदेशीर सावकारी करणाऱ्या दोघांना पोलिसांनी केली अटक

### २ कोटींच्या बदल्यात पावणेचार कोटी उकळले; तरीही १८ कोटींची मागणी

नगर - व्यवसायासाठी घेतलेल्या कर्जापोटी मुद्दलापेक्षा दुप्पट रक्कम वसूल करूनही आणखी तब्बल १८ कोटी ३८ लाखांची अवाजवी मागणी करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी दत्तात्रय जगन्नाथ आगरकर (वय ७७, रा. आगरकर मळा, अहिल्यानगर) यांच्या फिर्यादीवरून सावकार सुरेश मोतीलाल कांकरिया (रा. विराज कॉलनी, तारकपूर, अहिल्यानगर) आणि त्याचा साथीदार विनय गुरुलिंग होनराव (वय ५५, रा. होनराव वाडा, डावरे गल्ली, अहिल्यानगर ) या दोघांविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे.

फिर्यादी दत्तात्रय आगरकर यांनी मुलाच्या व्यवसायासाठी २०१६ पासून सुरेश मोतीलाल कांकरिया याच्याकडून अडीच टक्के मासिक व्याजदराने टप्प्याटप्प्याने दोन कोटी रुपये उसने घेतले होते. या कर्जाची सुरक्षितता म्हणून आरोपीने आगरकर यांच्या मालकीचा चौधराणा बुद्रुक येथील बिनशेती प्लॉट, घाणेगाव येथील शेती आणि केडगाव येथील शेतजमीन स्वतःच्या नावावर बळजबरीने खरेदीखत करून घेतली होती.

आगरकर यांनी वेळोवेळी रोख आणि धनादेशाद्वारे एकूण ३ कोटी ७५ लाख रुपये आरोपीला परत केले. संपूर्ण व्यवहार संपवण्यासाठी आगरकर यांनी जमिनीपोटी आणखी रक्कम देऊनही आरोपी सुरेश कांकरिया आणि विनय होनराव यांनी तारण ठेवलेली मिळकत परत देण्यास स्पष्ट नकार दिला. उलट आरोपींनी मोबाइलवर हिशोबाचा कागद पाठवून अजून १८ कोटी ३८ लाख १४ हजार ६९५ रुपये बाकी असल्याचा दावा केला. ही रक्कम न दिल्यास जमिनी हडप करण्याची आणि कुटुंबाला संपवण्याची धमकी आरोपींनी दिली. या त्रासाला कंटाळून दत्तात्रय आगरकर यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. हा गुन्हा दाखल झाल्यावर स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. संतोष मुटकुळे यांनी पोलीस अंमलदार संदिप पवार, विजय ठोंबरे, सतीष भवर व महिला पोलीस अंमलदार किरण तुबे अशांचे पथक तयार करून गुन्हयातील निष्पन्न आरोपीचा शोध घेऊन कारवाई करणेबाबत सुचना दिल्या. त्या नुसार या पथकाने आरोपींचा शोध घेवून त्यांना पकडून पुढील कारवाई साठी तोफखाना पोलिसांच्या ताब्यात दिले.

## ४ हजारांची लाच मागणाऱ्या मंडळ अधिकारी महिलेला अटक

### लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई; गुन्हा दाखल

नगर - खरेदी केलेल्या प्लॉटची शासकीय संगणकीय नोंद करण्यासाठी चार हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी कापूरवाडीच्या मंडळ अधिकारी संगीता नारायण पुंड यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस निरीक्षक छाया देवरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली.

तक्रारदाराने खरेदी केलेल्या प्लॉटची सरकारी दप्तरी संगणकीय नोंद करण्यासाठी मंडळ अधिकारी कार्यालयात पाठपुरावा केला होता. त्या वेळी कापूरवाडी मंडळ अधिकारी कार्यालयात लोकसेविका संगीता पुंड यांनी यापूर्वी घेतलेल्या एक हजार रुपयांच्या रकमेस दुजोरा दिला. तसेच काम पूर्ण करण्यासाठी उर्वरित चार हजार रुपयांच्या लाचेची मागणी पंचांसमक्ष करून ती रक्कम घेण्याची तयारी दर्शवली.

या पडताळणीनंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस निरीक्षक छाया देवरे यांच्या तक्रारीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर पोलिसांनी संगीता पुंड यांना तत्काळ अटक केली. पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. शासकीय कामासाठी कुणीही लाच मागितल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

WANTED
नर्सिंग स्कूलसाठी अ.नगरमध्ये
अकौंटंट (टॅली प्राईम)
क्लर्क (अनुभवी)
ट्युटर (B. Sc. Nursing)
9604672246

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 04 ते 10 सप्टेंबर 2026
हनुमान अंश (हिंदी) 08:00 AM 07:15 PM 11:00 AM 07:30 PM 12:30 PM 10:15 PM 02:00 PM
टॉक्सिक 08:30 AM 03:30 AM 10:15 PM
मिर्झापूर 03:15 PM 08:00 AM 06:00 PM 10:00 AM 06:50 PM 11:35 PM 09:45 PM 02:15 PM 10:30 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
CONNPLEX SMART THEATRE — Available on bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar Mo. 6353564618 / 7790094001

दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे
दि. : ०४ ते १० सप्टेंबर २०२६
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
टॉक्सिक (हिंदी) SCREEN - 1
03.00 PM 150/-
मिर्झापूर 09.00 PM 200/-
हनुमान अंश 06.30 PM 150/-
द्विधा 12.00 PM 100/-
SCREEN - 2
मिर्झापूर 10.00 PM 100/- 02.00 PM 150/- 06.00 PM 200/- 10.00 PM 200/-
आशा स्क्वेअर
कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर

पाऊल टाका स्टाईलमध्ये!
एकाच छताखाली हजारो स्टाईल्सची निवड!
पुरुष । महिला । मुलांसाठी
प्रत्येक प्रसंगासाठी योग्य, आरामदायी आणि ट्रेंडी फुटवेअर
पुरुषांसाठी | महिलांसाठी | मुलांसाठी
उपलब्ध नामांकित ब्रँड्स
adidas NIKE PUMA Reebok SKECHERS asics campus sparx ABROS Bata RELAXO Paragon crocs Hush Puppies Lee Cooper RED TAPE Red Chief Woodland WILDCRAFT CONVERSE KOLHAPURI मोजडी
आपल्या संपूर्ण कुटुंबासाठी फुटवेअरची परिपूर्ण शॉपिंग!
एम.जी.रोड, कापड बाजार, अहिल्यानगर
आजच भेट द्या !
एकदा या.. पुन्हा याल!
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता!
Liberty SHOES
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
SHOE PALACE शू पॅलेस
सारडागल्ली, अ.नगर, मो : 9881531536

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# चेकचा अनादर प्रकरणी आरोपीस कारावास व दंडाची शिक्षा

नगर - अहमदनगर येथील ६ वे अतिरक्त चिफ ज्युडिशिल मॅजिस्ट्रेट यांनी सोमनाथ राजु क्षिरसागर रा. कर्पे मळा, सारस नगर, अहिल्यानगर यास निगोशिएबल इन्स्ट्रूमेट अॅक्ट कलम १३८ अंतर्गत तीन महिने साधा कारावास व तसेच त्यांना रु.६४,८००/- आरोपीस दंड केला आहे. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे दंडाची रक्कम न भरल्यास एक महिना साधा कारावासाची शिक्षा सुनावलेली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादीत भिस्तबाग अहमदनगर येथुन सोमनाथ राजु क्षिरसागर यांनी रक्कम रु. ३०,०००/- दिनांक ०७/०१/२०२५ रोजी कर्ज घेतलेले होते व तसेच कर्जाचा हप्ता नियमितपणे भरणा करणार असा विश्वास दिला होता परंतू त्यांनी कर्जाच्या हप्त्याची रक्कम थकवली होती. सदर थकीत रक्कमेपोटी आरोपी यांनी रक्कम रुपये रु.३२,४००/- चा चेक दिनांक १४/०५/२०२५ रोजीचा फिर्यादी पुण्यश्लोक अहिल्यादेवी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादीत भिस्तबाग अहमदनगर यांना दिला होता. त्यानंतर फिर्यादी संस्थेने सदरचा चेक हा त्यांचे खाते असलेल्या अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेन्ट्रल को ऑप बँक लि. शाखा सावेडी रोड, अहमदनगर येथे चेक हा वटण्यासाठी भरला असता खात्यात पुरेशी शिल्लक रक्कम नसल्याने चेक न वटता परत आला होता. त्यामुळे फिर्यादी संस्थेने सोमनाथ राजु क्षिरसागर रा. कर्पे मळा, सारस नगर, अहिल्यानगर यांचे विरुध्द निगोशिएबल इन्स्ट्रूमेट अॅक्ट कलम १३८ प्रमाणे केस दाखल केली होती. सदर केसमध्ये फिर्यादी संस्थेचा पुरावा ग्राहय धरून आरोपीस शिक्षा ठोठवली आहे. सदर केसमध्ये फिर्यादी संस्थेच्या वतीने सौ. चंद्रकला मधुकर भांड व्यवस्थापिका व माहितगार इसम म्हणुन श्री. गणेश हिरालाल दायमा यांनी काम पाहिले.

फिर्यादी संस्थेतर्फे अॅड. नवनाथ किसन नरसाळे यांनी सक्षमपणे बाजु मांडली. या निर्णयामुळे आर्थिक संस्थांना संरक्षण मिळेल. तसेच चेक बांऊस प्रकरणी कायदयाचा धाक अधिक बळकट होईल असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे व अशा प्रकारच्या फसवणुकीस आळा बसण्यास मदत होईल.





भुईकोट किल्ल्याच्या संवर्धन आणि पर्यटनाच्या दृष्टीने मंजूर करण्यात आलेल्या कामांच्या पार्श्वभूमीवर भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी किल्ल्याची प्रत्यक्ष पाहणी केली. शेजारील छायाचित्रात संबंधित अधिकारी व ठेकेदारांकडून मंजूर झालेल्या कामांच्या संपूर्ण आराखड्याची माहिती घेताना खा. सुजय विखे पाटील.

# डॉ. सुजय विखे पाटील यांनी केली भुईकोट किल्ल्याची पाहणी

## संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांकडून घेतली मंजूर कामांच्या आराखड्याची माहिती

नगर - ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याच्या संवर्धन आणि पर्यटनाच्या दृष्टीने मंजूर करण्यात आलेल्या कामांच्या पार्श्वभूमीवर भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी किल्ल्याची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकारी व ठेकेदारांकडून मंजूर झालेल्या कामांच्या संपूर्ण आराखड्याची माहिती घेत, प्रत्यक्षात किल्ल्याच्या कोणत्या भागात काय होणार आहे, याचा जागेवरच आढावा घेतला.

डॉ. विखे पाटील यांनी अधिकाऱ्यांसमवेत किल्ल्याच्या विविध भागांची पाहणी केली. प्रस्तावित कामांची रचना, ऐतिहासिक वास्तूंचे जतन, परिसराचे नियोजन तसेच पर्यटकांच्या दृष्टीने करण्यात येणाऱ्या सुविधांबाबत त्यांनी संबंधितांकडून सविस्तर माहिती जाणून घेतली.

पाहणी दरम्यान आराखड्यातील कामांची प्रत्यक्ष जागेशी सांगड घालत आवश्यक त्या बाबींवर त्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा केली. ज्या ठिकाणी आवश्यक बदल किंवा सुधारणा करणे गरजेचे आहे, त्याबाबतही त्यांनी संबंधितांना सूचना केल्या. ऐतिहासिक वारशाचे मूळ स्वरूप आणि महत्त्व जपतच पुढील नियोजन करण्यात यावे, यावर त्यांनी विशेष भर दिला.

भुईकोट किल्ल्याच्या नूतनीकरणासाठी निधी मंजूर झाल्यानंतर लष्करी प्रशासनासोबतचा सामंजस्य करार हा महत्त्वाचा टप्पा होता. हा विषय मार्गी लागण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री, एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच आमदार संग्राम जगताप यांच्या पातळीवर झालेल्या प्रयत्न आणि पाठपुराव्यामुळे चजण पूर्ण झाला असून, आता मंजूर आराखड्यानुसार पुढील प्रक्रिया मार्गी लागली आहे.

किल्ल्याशी संबंधित ऐतिहासिक वास्तू, स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती आणि महत्त्वपूर्ण ऐतिहासिक संदर्भांचे जतन करून ते नव्या पिढीसमोर प्रभावीपणे मांडण्याचे नियोजन आहे. डिस्कव्हरी ऑफ इंडिया सह सरदार वल्लभभाई पटेल आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याशी संबंधित ऐतिहासिक संदर्भांनाही या माध्यमातून उजाळा मिळणार आहे. यावेळी संबंधित अधिकारी, ठेकेदार आदी उपस्थित होते.

# ७७६ रस्त्यांच्या बनावट टेस्ट रिपोर्ट प्रकरणी पोलिसांना अहवाल सादर करण्याचे आदेश

## तक्रारदार किरण काळेंच्या अर्जावर न्यायालयाची मोठी कारवाई

नगर - अहिल्यानगर मनपा कडून सन २०१६ ते २०२० या कालावधीत शहरात झालेली ७७६ रस्त्यांची निकृष्ट कामे, एकच काम नाव बदलून दोन किंवा अधिक वेळा दाखवून निधी लाटणे, कामे न करताच केल्याचे कागदोपत्री दाखवून गुणवत्तेचे खोटे, बनावट टेस्ट रिपोर्ट सादर करत कोट्यवधी रुपयांचा निधी हडपल्याचा अत्यंत गंभीर प्रकार समोर आला आहे. ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख व या प्रकरणातील तक्रारदार किरण काळे यांनी जिल्हा न्यायालयात दाखल केलेल्या खाजगी फिर्याद अर्जावर सुनावणी करताना अहिल्यानगर येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी तथा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी के. एम. सोनवणे यांनी तोफखाना पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांना बीएनएसएस २०२३ च्या कलम १७५ (३) अन्वये तीस दिवसांच्या आत अहवाल सादर करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत.

या प्रकरणात अॅड. राहुल एम. पवार यांनी तक्रादाराच्या वतीने जिल्हा न्यायालया समोर केलेल्या जोरदार युक्तीवादा नंतर कोर्टाने आदेश केला. या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये देखील जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. त्याम ध्ये ड. अभिजीत दरंदले यांनी युक्तिवाद केला. या कारवाईमुळे खाजगी फिर्यादीत नमूद म हापालिकेतील तत्कालीन अधिकारी, ठेकेदारांसह ३० ते ४० संशयितांचे धाबे मात्र चांगलेच दणाणले आहेत. न्यायालयीन आदेशा नंतर शहरात प्रचंड खळबळ उडाली आहे. जेल वारीची वेळ आता येऊ घातल्यामुळे घोटाळेबाजांना चांगलीच धडकी भरली आहे. या घोटाळ्यात कंत्राटदार आणि महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी संगनमत करून रस्त्यांच्या गुणवत्तेचे बनावट टेस्ट रिपोर्ट तयार केले. हे बनावट अहवाल खरे असल्याचे भासवून महापालिकेकडून सार्वजनिक निधीची कोट्यवधी रुपयांची बिले मंजूर करून लाटण्यात आली.

तक्रारदार किरण काळे यांना आरटीआय मधून प्राप्त झालेल्या दस्तऐवजां नुसार आणि शासकीय तंत्रनिकेतन, अहिल्यानगरच्या पाच सदस्यीय तांत्रिक समितीच्या अहवाला नुसार अत्यंत धक्कादायक बाब समोर आली आहे. त्यातूनच या घोटाळ्याचा भांडाफोड झाला आहे. काळे यांच्या तक्रारीनंतर मनपाने शासकीय तंत्रनिकेतनकडे पडताळणीसाठी पाठवलेल्या एकूण ८७९ टेस्ट रिपोर्ट पैकी तब्बल ७२५ टेस्ट रिपोर्ट व ५१ थर्ड पार्टी रिपोर्ट असे एकूण ७७६ रिपोर्ट हे शासकीय तंत्रनिकेतनने जारी केलेले नसल्याचे समोर आल्याने ते बनावट असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर रिपोर्ट हे शासकीय तंत्रनिकेतनचे बनावट लेटरहेड, बनावट सही-शिक्क्यांचा वापर करून तयार केलेले गेले असल्याचे चौकशी अहवालातून समोर आले आहे.

# चेकचा अनादर प्रकरणी आरोपीस कारावास व २ लाख ४० हजारांच दंड

नगर - अहमदनगर येथील १५ वे अतिरक्त चिफ ज्युडिशिल मॅजिस्ट्रेट यांनी किर्ती शैलेंद्र गुरप रा. भराड गल्ली, तोफखाना, अहिल्यानगर हिस निगोशिएबल इन्स्ट्रूमेट अॅक्ट कलम १३८ अंतर्गत दोन महिने साधा कारावास व तसेच त्यांना रु. २,४०,०००/- आरोपीस दंड केला आहे. कोर्टाच्या आदेशाप्रम णे दंडाची रक्कम न भरल्यास एक महिना साधा कारावासाची शिक्षा सुनावलेली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादीत भिस्तबाग अहमदनगर येथुन किर्ती शैलेंद्र गुरप यांनी रक्कम रु.२,००,०००/- दिनांक २७/०८/२०२४ रोजी कर्ज घेतलेले होते व तसेच कर्जाचा हप्ता नियमितपणे भरणा करणार असा विश्वास दिला होता परंतू त्यांनी कर्जाच्या हप्त्याची रक्कम थकवली होती. सदर थकीत रक्कमेपोटी आरोपी यांनी रक्कम रुपये रु.२,०१,४००/- चा चेक दिनांक २०/०१/२०२५ रोजीचा फिर्यादी पुण्यश्लोक अहिल्यादेवी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादीत भिस्तबाग अहमदनगर यांना दिला होता. त्यानंतर फिर्यादी संस्थेने सदरचा चेक हा त्यांचे खाते असलेल्या अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेन्ट्रल को ऑप बँक लि. शाखा सावेडी रोड, अहमदनगर येथे चेक हा वटण्यासाठी भरला असता खात्यात पुरेशी शिल्लक रक्कम नसल्याने चेक न वटता परत आला होता. त्यामुळे फिर्यादी संस्थेने किर्ती शैलेंद्र गुरप रा. भराड गल्ली, तोफखाना, अहिल्यानगर यांचे विरुध्द निगोशिएबल इन्स्ट्रूमेट अॅक्ट कलम १३८ प्रमाणे केस दाखल केली होती. सदर केसमध्ये फिर्यादी संस्थेचा पुरावा ग्राहय धरून आरोपीस शिक्षा ठोठवली आहे. सदर केसमध्ये फिर्यादी संस्थेच्या वतीने सौ. चंद्रकला मधुकर भांड व्यवस्थापिका व माहितगार इसम म्हणुन श्री. गणेश हिरालाल दायमा यांनी काम पाहिले.

फिर्यादी संस्थेतर्फे अॅड. नवनाथ किसन नरसाळे यांनी सक्षमपणे बाजु मांडली. या निर्णयामुळे आर्थिक संस्थांना संरक्षण मिळेल. तसेच चेक बांऊस प्रकरणी कायदयाचा धाक अधिक बळकट होईल असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे व अशा प्रकारच्या फसवणुकीस आळा बसण्यास मदत होईल.

# 'सोशल मीडिया लोकमान्य स्वराज्य सैनिक गौरव योजना' जाहीर

## सत्य आणि लोकहितासाठी डिजिटल माध्यमातून लढणाऱ्यांचा होणार सन्मान, पीपल्स हेल्पलाईन, भारतीय जनसंसदेचा उपक्रम



नगर - समाजमाध्यमांचा वापर करून अन्याय, भ्रष्टाचार, सामाजिक विषमता आणि लोकहिताच्या प्रश्नांवर जनजागृती करणाऱ्या नागरिकांना प्रोत्साहन देण्यासाठी पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने 'सोशल मीडिया लोकमान्य स्वराज्य सैनिक गौरव योजना' जाहीर करण्यात आली आहे. 'तिरंगा राष्ट्रीय धारणालय क्रांती' या उपक्रमाचा हा एक भाग असल्याचे संघटनांकडून सांगण्यात आले.

समाजमाध्यमांच्या वाढत्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांकडून विविध सामाजिक प्रश्न मांडले जात आहेत. अन्याय किंवा गैरप्रकारांविषयी माहिती उपलब्ध करून देणे, लोकांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचविणे तसेच विविध विषयांवर जनजागृती करणे यासाठी डिजिटल माध्यमांचा वापर करणाऱ्या व्यक्तींना या उपक्रमातून प्रोत्साहन देण्याचा उद्देश असल्याचे संघटनांनी स्पष्ट केले.

पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष अॅड. कारभारी गवळी यांनी सांगितले की, समाजमाध्यमांवरील लोकप्रियता किंवा फॉलोअर्सची संख्या हा सन्मानाचा निकष असणार नाही. संबंधित व्यक्तीने सत्याधारित माहिती मांडणे, उपलब्ध पुराव्यांचा जबाबदारीने वापर करणे आणि लोकहिताच्या प्रश्नांवर अहिंसक पद्धतीने जनजागृती करणे याला महत्त्व दिले जाणार आहे.

योजनेअंतर्गत समाजमाध्यमांवर सक्रिय असलेल्या नागरिकांच्या कार्याचा विचार केला जाणार आहे. पत्रकार, विद्यार्थी, महिला, शेतकरी, कामगार, विधिज्ञ तसेच सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींनाही या उपक्रमासाठी विचारात घेतले जाणार असल्याचे संघटनांनी म्हटले आहे.

माहितीची सत्यता पडताळणे, पुराव्यांच्या आधारे विषय मांडणे, संबंधित व्यक्तींच्या मानवी प्रतिष्ठेचा आदर राखणे आणि चुकीची माहिती समोर आल्यास तिची दुरुस्ती करणे, या बाबींना महत्त्व दिले जाणार आहे. समाजमाध्यमांचा वापर जबाबदारीने करून लोकहिताचे प्रश्न मांडणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची दखल घेणे हा या योजनेचा मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले.

त्याचबरोबर द्वेषमूलक प्रचार, हिंसेचे समर्थन, अफवा, खोटी किंवा बनावट माहिती, बदनामी तसेच व्यक्तीच्या गोपनीयतेचे उल्लंघन करणाऱ्या स्वरूपाचे काम करणाऱ्यांना या सन्मानासाठी पात्र ठरविले जाणार नाही,

संविधानिक मूल्ये आणि लोकहिताच्या प्रश्नांसाठी डिजिटल माध्यमातून काम करणाऱ्या नागरिकांना दिला जाणारा प्रतीकात्मक नागरी सन्मान असल्याचेही संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

निवड प्रक्रियेत कार्याची सत्यता, त्यामागील पुरावे आणि समाजावर झालेला परिणाम यांचा विचार केला जाणार आहे. समाजमाध्यमांवरील प्रसिद्धीपेक्षा जबाबदार माहिती प्रसारित करणे आणि लोकहिताच्या प्रश्नांना योग्य पद्धतीने वाचा फोडणे याला अधिक महत्त्व देण्यात येणार आहे.

अॅड. कारभारी गवळी म्हणाले की, फॉलोअर्सची संख्या कोणालाही सोशल मीडिया स्वराज्यसैनिक बनवत नाही. सत्यनिष्ठा, घटनात्मक मूल्यांवरील विश्वास, अहिंसक पद्धतीने प्रश्न मांडणे आणि लोकहितासाठी केलेले कार्य हीच या सन्मानाची प्रमुख पात्रता आहे.

समाजमाध्यमांचा सकारात्मक आणि जबाबदार वापर वाढावा, नागरिकांनी सत्याधारित माहितीच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न मांडावेत आणि लोकहिताच्या विषयांवर व्यापक जनजागृती व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेने म्हटले आहे. या मोहिमेसाठी अशोक सब्बन, प्रकाश थोरात, अॅड. अमित थोरात, राहुल आढाव, बाळासाहेब पालवे, आनंद आढाव, अशोक भोसले, पोपट भोसले, वीर बहादुर प्रजापती, शाहीर कान्हू सुंबे, अभिमान शिंदे, बाबासाहेब भोसले, अमित थोरात आदी प्रयत्नशील आहेत.

# मुक्तसंचार गोठा व दूध काढणी यंत्रासाठी अनुदान योजना

## शासकीय योजनेचा शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन

नगर - पशुपालकांच्या दुग्ध व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन दूध उत्पादन वाढविणे, पशुधनाची योग्य निगा राखणे तसेच पशुपालकांचा वेळ व श्रम वाचविण्याच्या उद्देषाने जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत जिल्हा परिषद सेस निधीमधून मुक्तसंचार गोठा आणि दूध काढणी यंत्रासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे.

मुक्तसंचार गोठ्याच्या माध्यमातून जनावरांना मोकळ्या व हवेशीर वातावरणात ठेवण्याची सुविधा उपलब्ध होणार असून, पशुधनाच्या आरोग्य व व्यवस्थापनामध्ये सुधारणा होण्यास मदत होणार आहे. मुक्त संचार गोठा उभारणीसाठी जिल्हा परिषद सेस निधीमधून ५० टक्के किंवा रु २००००/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान देण्यात येणार आहे. तसेच दुग्ध व्यवसायातील श्रम कमी करण्यासाठी दूध काढणी यंत्र खरेदीसाठी अनुदान उपलब्ध करुन देण्याची तरतूद करण्यात आली आहे. यसामध्ये जिल्हा परिषद सेस निधीमधून ६० टक्के किंवा रु १५०००/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान देण्यात येणार आहे.

या आधुनिक सुविधांमुळे दूध काढण्याची प्रक्रिया अधिक स्वच्छ, सुलभ व वेळेची बचत करणारी होण्यास मदत होणार आहे. पुशपालकांनी संबंधित योजनेची माहिती व अर्ज करण्यासाठी नजीकच्या पशुवैद्यकीय चिकित्सलयाशी संपर्क साधावा. वरील योजनाचे अर्ज नजीकच्या पशुवैद्यकीय चिकित्सलायामार्फत दि. २४ सप्टेंबर २०२६ पर्यंत स्वीकारण्यात येतील. तरी पशुपालकांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर मार्फत आवाहन करण्यात येत आहे.



शहरातील भटक्या कुत्र्यांच्या प्रश्ना बाबत महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देताना ड. विक्रम वाडेकर, प्रदीप वाखुरे, प्रा हर्षल आगळे, विकास गायकवाड, राहुल जोशी, ड.कैलाश दिघे आदी.

# करा काम जरा हटके, होतील कमी कुत्रे भटके

## जाणीव फाऊंडेशनचे अहिल्यानगर महापालिका आयुक्तांना निवेदन

नगर - भटक्या कुत्र्यांचा त्रास रोखण्यासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना करण्याबाबतचे निवेदन जाणीव फाऊंडेशनच्या वतीने मोहटादेवी ट्रस्टचे विश्वस्त नोटरी पब्लिक अॅड. विक्रम वाडेकर, बांधकाम व्यावसायिक प्रदीप वाखुरे, प्रा हर्षल आगळे, उद्योजक विकास गायकवाड, राहुल जोशी, अॅड. व इंजिनीअर कैलाश दिघे इत्यादींच्या हस्ते मनपा आयुक्त यशवंत डांगे साहेब यांना देण्यात आले.

सध्या शहरात भटक्या कुत्र्यांचा त्रास भयंकर वाढला असून सर्वसामान्य जनजीवन गंभीरपणे बाधित होत आहे. विशेषत: लहान मुले, महिला व जेष्ठ नागरिक यांना कुत्र्यांच्या भीतीपोटी घराबाहेर पडणे कठीण झाले आहे.

गेल्या काही दिवसांत अनेक लहान मुले, महिला व जेष्ठ नागरिकांना भटके कुत्रे चावले आहेत. कुत्रा चावेल या भीतीपोटी लहान मुले, महिला व जेष्ठ नागरिक यांच्या मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. त्यामुळे लवकरात लवकर भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी विनंती या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी फक्त मनपाची यंत्रणा पुरेशी नाही तर सजग नागरिक व समाजसेवी संस्थांनी सहभाग घेणे अपेक्षित आहे. कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी मनपाकडून त्वरित आणि प्रभावी कारवाई होईल, अशी आमची रास्त अपेक्षा आहे, ज्यामुळे आपल्या शहरातील सर्वसामान्य नागरिक भटक्या कुत्रांपासून सुरक्षित राहतील, असे निवेदनात म्हटले आहे.

# विशेष शिक्षकांची आ. किशोर दराडे यांच्याकडे प्रलंबित प्रश्नांसाठी धाव

## केंद्रस्तर विशेष शिक्षकांच्या मागण्यांवर आमदार दराडेंचे सकारात्मक आश्वासन

नगर - नगर जिल्हा परिषद व महानगरपालिका शिक्षण विभागातील केंद्रस्तर विशेष शिक्षकांच्या विविध प्रलंबित समस्या व मागण्यांबाबत शिवसेना केंद्रस्तर विशेष शिक्षक सेलच्या वतीने नाशिक विभागाचे शिक्षक आमदार किशोर दराडे यांना निवेदन देण्यात आले. निवेदनाची दखल घेत आमदार दराडे यांनी लवकरच मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) यांच्याशी चर्चा करून विशेष शिक्षकांच्या समस्या तातडीने मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

केंद्रस्तर विशेष शिक्षकांकडून दिव्यांग विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मूल्यमापन, वैयक्तिक शैक्षणिक नियोजन, पालकांचे समुपदेशन तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्याचे महत्त्वपूर्ण काम केले जाते. मात्र, या शिक्षकांना त्यांच्या मूळ कर्तव्यांशी संबंधित नसलेली विविध अवांतर कामे सोपविली जात असल्याने दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याचा मुद्दा निवेदनातून मांडण्यात आला.

आमदार किशोर दराडे यांनी यावेळी विशेष शिक्षकांच्या भूमिकेचे समर्थन करताना, केंद्रात दिव्यांग विद्यार्थी असताना विशेष शिक्षकांना अनावश्यक काम काजात गुंतवून ठेवणे चुकीचे आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा मूलभूत अधिकार अबाधित राहिला पाहिजे, अशी भूमिका मांडली. विशेष शिक्षकांसाठी योग्य नियोजन करून त्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले. अनेक वर्षांपासून सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या विशेष शिक्षकांच्या कार्याचा योग्य गौरव व सन्मान झाला पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.



नगर जिल्हा परिषद व महानगरपालिका शिक्षण विभागातील केंद्रस्तर विशेष शिक्षकांच्या विविध प्रलंबित समस्या व मागण्यांबाबत शिवसेना केंद्रस्तर विशेष शिक्षक सेलच्या वतीने नाशिक विभागाचे शिक्षक आमदार किशोर दराडे यांना निवेदन देण्यात आले.

केंद्रस्तर विशेष शिक्षक सेलचे अध्यक्ष उमेश बलभीम शिंदे यांनी विशेष शिक्षकांच्या समस्यांकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची मागणी केली. ते म्हणाले, हा लढा केवळ शिक्षकांच्या सेवा-सुविधांचा नसून दिव्यांग विद्यार्थ्यांच्या भविष्याशी जोडलेला आहे. विशेष शिक्षकांना बीएलओसारख्या कामांमध्ये दीर्घकाळ गुंतवून ठेवल्यामुळे ते त्यांच्या मूळ शैक्षणिक कार्यापासून दूर जात आहेत. परिणामी दिव्यांग विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक मार्गदर्शन व सुविधा मिळण्यात अडथळे निर्माण होत आहेत.

काही केंद्रांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कारवाईची भीती दाखवून शिक्षकांवर दबाव आणला जात असल्याची तक्रारही त्यांनी केली. विशेष शिक्षकांना सुरक्षित, सन्मानजनक आणि त्यांच्या मूळ कार्याला पूरक वातावरण उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली.

विशेष शिक्षकांच्या प्रमुख मागण्यांमध्ये बीएलओ व अवांतर कामांतून मुक्तता, सामान्य शाळेतील वर्गकामाची सक्ती थांबवावी, अतिरिक्त कामांचा भार कमी करावा, स्वतंत्र कार्यस्थळ व सुविधा द्याव्यात, शासकीय ओळखपत्र द्यावे, मस्टरबाबत स्पष्ट निर्देश द्यावेत, कार्याचा गौरव करावा या प्रश्नाचा समावेश आहे.

विशेष शिक्षकांच्या या प्रश्नांवर प्रशासनाशी चर्चा करून योग्य तो तोडगा काढण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन आमदार किशोर दराडे यांनी दिले. यावेळी शिक्षक नेते वैभव सांगळे, सुनील पंडित, आप्पासाहेब शिंदे, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन बाबासाहेब बोडखे, महेंद्र हिंगे आदी उपस्थित होते.

# गृहिणी

## आरोग्य

### रक्तदाब ठेवा नियंत्रणात

रक्तदाब हा आजच्या धावपळीच्या जीवनातील एक सामान्य पण गंभीर प्रश्न बनला आहे. वेळीच काळजी घेतली नाही तर त्यामुळे हृदयावर आणि शरीरावर मोठा परिणाम होतो. त्यामुळे काही साध्या सवयी अंगीकारल्या तर रक्तदाब सहजपणे नियंत्रणात ठेवता येतो. सर्वात पहिले आपल्या आहाराकडे लक्ष देणे गरजेचे आहे. जेवणात मिठाचे प्रमाण कमी ठेवावे. जास्त तेलकट, तळलेले आणि बाहेरचे पदार्थ टाळावेत. त्याऐवजी हिरव्या पालेभाज्या, फळे, कडधान्ये यांचा आहारात समावेश करावा. लसूण, आवळा, आणि दुधी भोपळा हे रक्तदाबासाठी उपयुक्त मानले जातात. दिवसभरात भरपूर पाणी प्यावे.दुसरे महत्त्वाचे म्हणजे दररोज थोडा वेळ व्यायाम करणे. सकाळी अर्धा तास चालणे, योगासने करणे, प्राणायाम करणे यामुळे रक्तप्रवाह सुधारतो आणि मन शांत राहते. राग, चिंता आणि ताणतणाव हे रक्तदाब वाढण्याचे मुख्य कारण आहे. त्यामुळे ध्यानधारणा केल्याने मनाला शांती मिळते. झोप ही सुद्धा तितकीच महत्त्वाची आहे. रात्री वेळेवर झोपणे आणि किमान सात ते आठ तास पूर्ण झोप घेणे आवश्यक आहे. धूम्रपान आणि मद्यपान यापासून पूर्णपणे दूर राहावे कारण त्यामुळे रक्तवाहिन्यांवर वाईट परिणाम होतो. नियमितपणे रक्तदाब तपासून घ्यावा. डॉक्टरांनी दिलेला सल्ला पाळावा आणि स्वतःच्या मनाने औषध बंद करू नये. जर जीवनशैलीत हे छोटे बदल केले तर औषधाशिवाय देखील रक्तदाब नियंत्रणात राहू शकतो आणि निरोगी आयुष्य जगता येते.

## पाककला

### ठेचा खिचडी

**साहित्य :** तांदूळ १ वाटी (कोलम किंवा इंद्रायणी), मूग डाळ १/२ वाटी, पाणी ३ ते ३.५ वाट्या, हिरव्या मिरच्या ८ ते १० (तिखट वाली), लसूण पाकळ्या १० ते १२, भाजलेले शेंगदाणे २ चमचे, जिरे १ चमचा, हळद १/४ चमचा, तेल २ मोठे चमचे, मीठ चवीनुसार, बारीक चिरलेली कोथिंबीर १ चमचा, कच्चे शेंगदाणा तेल वरून घालण्यासाठी १ चमचा

**कृती :** सर्वात आधी तांदूळ आणि मूग डाळ स्वच्छ धुवून घ्या. अर्धा तास पाण्यात भिजत ठेवा. म्हणजे खिचडी मऊ शिजते. आता ठेचा बनवूया. खलबत्त्यात हिरव्या मिरच्या, लसूण, भाजलेले शेंगदाणे, जिरे आणि थोडं मीठ घालून जाडसर कुटून घ्या. मिक्सरमध्ये बारीक पेस्ट करू नका, खलबत्त्यातलाच खरा ठेचा भारी लागतो. कुकरमध्ये २ चमचे तेल गरम करा. त्यात तयार ठेचा टाका आणि मंद आचेवर १ मिनिट खमंग परतून घ्या. वास येईपर्यंत परता. मग त्यात हळद टाका. आता भिजवलेले तांदूळ आणि डाळ पाणी काढून कुकरमध्ये टाका. २ मिनिट तेलावर परतून घ्या. त्यात ३ वाट्या गरम पाणी आणि चवीनुसार मीठ टाका. व्यवस्थित हलवा. कुकरचे झाकण लावून मध्यम आचेवर ३ शिट्ट्या होईपर्यंत शिजवून घ्या. कुकर थंड झाल्यावर झाकण उघडा. गरमागरम खिचडीवर १ चमचा कच्चे शेंगदाणा तेल आणि भरपूर कोथिंबीर घाला. दही, पापड आणि लोणच्याबरोबर सर्व्ह करा.

## वास्तू

### पैसा आकर्षित करणारी झाडे

मनी प्लांट हे सगळ्यात जास्त पैसा खेचणारं झाड मानलं जातं. याला नेहमी उत्तर किंवा ईशान्य दिशा (उत्तर-पूर्व कोपरा) मध्ये लावा. चुकूनही दक्षिण किंवा आग्नेय दिशेला लावू नका, त्याने पैसा अडकतो असं वास्तूमध्ये सांगितलं जातं. जमिनीत न लावता कुंडीत लावात्याची वेल वरच्या दिशेला जाऊ द्या. घरात काटेरी झाडे जसे निवडुंग, बाभूळ कधीच लावू नका. सुकलेली, वाळलेली झाडे लगेच घरातून काढा, त्याने नकारात्मकता येते. झाडे नेहमी स्वच्छ आणि हिरवीगार ठेवा.

## सौंदर्य

कच्चा बटाटा किसून त्याचा रस काढा. कापसाने तो रस मानेवर लावा. २० मिनिटांनी धुवा. बटाट्यात नैसर्गिक ब्लीच असते, त्याने मान हळूहळू गोरी होते. रोज करू शकता. आंघोळ करताना मान घासा.

## सल्ला

डाळ शिजवताना त्यात एक चमचा तूप आणि चिमूटभर हळद टाका, डाळ लवकर शिजते. भात शिजवताना पाण्यात ४-५ थेंब लिंबाचा रस आणि चमचाभर तूप टाका, भात मोकळा होतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १० सप्टेंबर २०२६

**दर्श-पिठोरी अमावास्या, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, श्रावण कृष्णपक्ष, मघा १४।०५, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आज कामात यश मिळेल. पैसे जपून वापराल.

**वृषभ :** कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील. नवीन संधी मिळेल.

**मिथुन :** प्रवास योग आहे. आरोग्याची काळजी घ्याल.

**कर्क :** मन शांत ठेवाल. जुन्या मित्राची भेट होईल.

**सिंह :** नोकरीत बढतीचे योग आहेत. आत्मविश्वास वाढेल.

**कन्या :** खर्च वाढेल. महत्त्वाचे निर्णय घेणे आज टाळाल.

**तुळ :** प्रेमात यश मिळेल. व्यवसायात फायदा होईल.

**वृश्चिक :** रागावर नियंत्रण ठेवाल. काम पूर्ण होईल.

**धनु :** शिक्षणात यश. देवदर्शना निमित्ताने बाहेरगावी जाल.

**मकर :** जमिनीच्या व्यवहारात लाभ. तब्येत उत्तम राहील.

**कुंभ :** नवीन काम सुरू करण्यासाठी चांगला दिवस.

**मीन :** आनंदाची बातमी मिळेल. अडकलेले पैसे परत मिळतील.

## शब्दगंध क्र. ७५१३ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | ■ | ५ |
| ६ | | ■ | ७ | ८ | | ९ | |
| | ■ | १० | | | ■ | ११ | |
| ■ | १२ | | ■ | ■ | १३ | | ■ |
| १४ | ■ | १५ | १६ | | | ■ | १७ |
| १८ | | ■ | | ■ | १९ | २० | |
| | ■ | २१ | | ■ | २२ | | |
| २३ | | | | ■ | २४ | | |

**आडवे शब्द :-** १) उच्च प्रतीचा एक तांदूळ ६) डोंगरी किल्ला ७) प्रारब्ध; दैव; प्राक्तन १०) सिंह वगैरे प्राण्याच्या मानेवरचे केस ११) आतापर्यंतच्या आयुष्याचे मोजमाप; इंग्रजीत एज १२) वर्तमान दिवस; चालू दिवस १३) मृत पतीच्या शरीराबरोबर स्वतःचे दहन करून घेणारी; पतिव्रता; पार्वती १५) दुर्लौकिक प्राप्त झालेला; नाव खराब झालेला १८) चार वर्णींपैकी एक १९) सत्त्वयुक्त; कसदार २१) मित्र; सोबती; यार २२) स्वामी; पती; धनी २३) परवानगीचे पत्र; परमिट २४) कालवा; पाट

**उभे शब्द :-** १) सुबत्ता; समृद्धी; सुकाळ २) झाडावर पिकलेले फळ ३) अगदी सहज; हसतखेळत ४) मार्ग; पथ; रस्ता ५) भगव्या रंगाचा ८) तोंडात तयार होणारा चिकट रस; मुखरस ९) सत्तावीस नक्षत्रांपैकी एक १०) आश्चर्यकारक १३) अगदी सारखे; तुल्य १४) वरून खाली थेंब थेंब पाणी पडण्याचा आवाज १६) रुग्णालय; हॉस्पिटल १७) वेशीवरचा पहारेकरी २०) भांडण; तंटा; वाद; बखेडा २१) एक अधिक पाव

### शब्दगंध क्र. ७५१२ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प | व | न | सु | त | ■ | का | पा |
| रा | न | ■ | वा | स | र | म | णी |
| ■ | ■ | क | स | र | त | ■ | दा |
| सं | क | ह | ■ | ■ | न | ग | र |
| प | र | ■ | द | र | बा | र | ■ |
| ■ | न | ज | र | ■ | ब | ज | न |
| धा | क | ■ | म | ग | ■ | वं | ग |
| वा | र | ■ | हा | त | ■ | त | री |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** प्रयत्न करणाऱ्यांच्या हातात यश असतं, नशिबाच्या नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### बर्फ पाण्यात तरंगतो पण दगड का बुडतो?

लहान मित्रांनो तुम्ही कधी उन्हाळ्यात सरबत प्यायले आहे का तेव्हा तुम्ही पाहिले असेल की सरबताच्या ग्लास मध्ये बर्फाचे तुकडे टाकले की ते वरच तरंगत राहतात खाली जात नाहीत पण त्याच ग्लास मध्ये जर तुम्ही चुकून एखादा छोटा दगड टाकला तर तो लगेच टणकन खाली जाऊन बसतो एक हलका दिसणारा बर्फ वर राहतो आणि एक छोटा दगड खाली जातो असे का होते यामागे खूप छान गोष्ट आहे ती आज आपण समजून घेऊयाआपल्या आजूबाजूला दोन प्रकारच्या वस्तू असतात एक हलकी वस्तू आणि दुसरी जड वस्तू जेव्हा एखादी वस्तू पाण्यापेक्षा हलकी असते तेव्हा पाणी तिला वर ढकलते आणि ती तरंगते पण जेव्हा एखादी वस्तू पाण्यापेक्षा जड असते तेव्हा पाणी तिला वर ढकलू शकत नाही आणि ती खाली बुडते हाच यातला सगळ्यात मोठा नियम आहे.

आता आपण बर्फाबद्दल बोलूया बर्फ कशापासून बनतो तर पाण्यापासूनच बनतो मग पाण्यापासून बनलेली वस्तू पाण्यावर कशी तरंगते असा प्रश्न तुम्हाला पडेल ना याचे उत्तर खूप गंमतीदार आहे जेव्हा पाणी खूप थंड होते तेव्हा ते बर्फ बनते तेव्हा पाण्याचे छोटे कण एकमेकांपासून थोडे लांब लांब जातात त्यांच्यामध्ये थोडी थोडी मोकळी जागा तयार होते त्या मोकळ्या जागेत हवा भरते आणि त्यामुळे बर्फ फुगतो म्हणजे पाण्याचा एक वाटी भर तुकडा जर बर्फ झाला तर तो थोडा मोठा होतो आकार मोठा झाला पण वजन तेच राहते त्यामुळे तो हलका होतो म्हणून तो पाण्यावर तरंगतोआता दगड कसा बनतो दगड हा जमिनीच्या आत खूप वर्षे दाबून दाबून तयार होतो त्यामुळे त्याचे कण एकमेकांना अगदी घट्ट चिकटलेले असतात त्यांच्यामध्ये अजिबात मोकळी जागा नसते हवा पण नसते त्यामुळे दगड आतून पूर्ण भरलेला असतो आणि खूप जड असतो तुम्ही दोन सारखे तुकडे घ्या एक बर्फाचा आणि एक दगडाचा दगडाचा तुकडा हाताला खूप जड लागेल आणि बर्फाचा तुकडा हलका लागेल म्हणून दगड पाण्यात टाकला की पाणी त्याला वर उचलू शकत नाही आणि तो लगेच खाली जातो.

तुम्ही अजून एक गंमत पाहू शकता तुम्ही लाकडाचा तुकडा पाण्यात टाका तो पण तरंगतो कारण लाकडामध्ये पण बारीक बारीक भोक असतात त्यात हवा असते पण त्याच आकाराचा लोखंडाचा तुकडा टाकला तर तो बुडतो कारण लोखंड घट्ट असते निसर्गाच्या या हुशारीमागे एक खूप मोठा विचार आहे विचार करा थंडीच्या दिवसात सगळ्या नद्या तलाव गोठतात जर बर्फ जड असता आणि खाली बुडाला असता तर सगळा बर्फ खाली खाली जाऊन साचला असता आणि नदी पूर्ण बर्फाने भरून गेली असती मग पाण्यात राहणारे मासे कासव बेडूक ते सगळे गारठून मरण पावले असते पण देवाने तसे होऊ दिले नाही बर्फ हलका असल्यामुळे तो पाण्याच्या वर एक चादर सारखा पसरतो.

एखाद्या गोधडी सारखा आणि त्या चादरी खाली पाणी थोडे गरम राहते त्यामुळे आतले जीव सुरक्षित राहतात म्हणून बर्फ तरंगणे हे आपल्या सगळ्यांसाठी खूप चांगले आहेम्हणून गोष्ट लक्षात ठेवा आपण पाण्यात एखादी वस्तू टाकली की दोन गोष्टी होतात जर ती वस्तू पाण्यापेक्षा हलकी असेल आणि तिच्या आत हवा असेल तर पाणी तिला प्रेमाने वर ठेवते आणि जर ती वस्तू पाण्यापेक्षा जड असेल आणि घट्ट असेल तर पाणी तिला सांभाळू शकत नाही आणि ती खाली जाते बर्फ हलका आहे म्हणून तो तरंगतो आणि दगड जड आहे म्हणून तो बुडतो.

### घरी दिलेला वेळ

एकदा एका गावात रघु नावाचा व्यापारी राहत होता. तो खूप श्रीमंत होता. त्याच्याकडे मोठे घर होते, गाडी होती, नोकर होते. त्याला एक छोटा मुलगा होता, त्याचे नाव सोनू.रघु सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत कामात असायचा. सोनूला तो खूप महागड्या भेटवस्तू आणून द्यायचा.

कधी मोठी गाडी, कधी महागडा फोन, कधी परदेशी खेळणी. सोनूच्या खोलीत खेळणीचा डोंगर झाला होता. पण सोनू कधीच खुश दिसत नव्हता. तो नेहमी खिडकीतून बाहेर बघत बसायचा.एक दिवस रघुने विचारले, अरे सोनू मी तुला सगळं आणून देतो मग तू नाराज का असतोस?

सोनू म्हणाला, बाबा माझ्या मित्राचा बाबा त्याच्या सोबत संध्याकाळी मैदानात क्रिकेट खेळतो. माझ्या मैत्रिणीची आई तिला रोज गोष्ट सांगते. मला पण तुमच्या सोबत खेळायचे आहे, गोष्ट ऐकायची आहे.

रघु म्हणाला, अरे त्यासाठी वेळ कुठे आहे? मी तुला त्यापेक्षा महागडी भेट आणून देईन. दुसऱ्या दिवशी सोनूचा वाढदिवस होता. रघुने खूप मोठी पार्टी ठेवली आणि एक खूप महागडी सायकल आणली. सगळे पाहुणे आले, पण रघु कामासाठी बाहेर गेला. सोनू सायकल जवळ उभा राहून रडू लागला.

तो म्हणाला, मला सायकल नको, मला बाबा हवे आहेत जे मला सायकल चालवायला शिकवतील. तेव्हा रघुच्या मनात प्रकाश पडला. त्याला कळले की मुलाला वस्तू नको असते, त्याला वडिलांचा वेळ हवा असतो.दुसऱ्या दिवसापासून रघुने संध्याकाळचा एक तास फक्त सोनू साठी ठेवला. त्या एका तासात तो फोन बंद ठेवायचा. कधी ते दोघे पतंग उडवायचे, कधी गोष्ट सांगायचे, कधी फक्त गप्पा मारायचे. आता सोनूच्या खोलीत खेळणी कमी झाली, पण त्याच्या चेहऱ्यावर हास्य वाढले. तो सगळ्यात आनंदी मुलगा झाला.

तात्पर्य : महागड्या भेटवस्तू पेक्षा आपल्या माणसांना दिलेला वेळ हा जास्त मोठा असतो.

## आत्मशक्ति



### भवसागर

तेव्हा आमचे लक्ष इतरत्र विचलित होत नाही. जेव्हा आपल्याला ओळखण्याची ही तीव्र इच्छा होते तेव्हा त्या गोष्टीकडे आमचा सारा वेळ व सारे लक्ष लागते. मग इतर आवडीनिवडी वा आकर्षणांकडे आपले लक्ष जात नाही. जेव्हा आत्म्याला जागृत करण्याची आमची इच्छा होते तेव्हा आत्मा त्या गोष्टीला प्रतिसाद देतो. त्याची शक्ती जागृत होऊ लागते. या गोष्टीकडे आम्हाला डोळेझाक करता येत नाही. ही त्याची हाक जेवढी प्रभावीत असेल तेवढ्या प्रमाणात आमचे लक्ष तिच्याकडे जाते. कालांतराने आमचे लक्ष आत्म्याच्या प्रेमाकडे, संगीत आणि आनंदाकडे ओढले जाऊन बाहेरची आकर्षणे कमी होत जातात व आम्ही अंतर्मुख होण्यात प्रविण होतो.

काय एका संकटानंतर दुसऱ्या व नंतर तिसऱ्या संकटाशी झुंज देत देत आम्ही ह्या संसार सागरांत वाहत जात आहोत ? तर मग आम्ही आमच्या आयुष्याचे ध्येय कसे गाठू शकू? जेव्हा आम्ही आमच्या आत्म्याकडे लक्ष देत नाही आणि वेळ वाया जात असतो, तेव्हा मनुष्य जीवनाचे आमचे उच्चतम ध्येय अपूर्ण राहण्याचा धोका असतो. पुष्कळदा आम्ही आमच्या कामात एवढे मग्न असतो की, आमचे जीवन, आमचे लक्ष्य आणि आमच्या प्रथम प्राधान्याच्या गोष्टींकडे लक्ष द्यावयास आम्हाला फुरसतच मिळत नाही. पुष्कळदा आम्हाला पटते की आमचे आयुष्य आमच्या हाती नाहीच! आमचा दैनंदिन कार्यक्रम एकतर आमच्या मालकांच्या हातात असतो किंवा कुटुंबियांच्या हातात असतो. आम्ही किती दिवस काम केले पाहिजे, आम्ही कोणती सुट्टी घ्यावयास हवी ह्या गोष्टींचा निर्णय आमचा व्यवसाय घेतो किंवा आम्हाला किती पैसे कमवावयाचे आहेत हा उद्देश्य ते ठरवतो. शरीराच्या गरजाही आम्हाला विचार करावयास लावतात. शरीर जतन करावयाचे तर त्यासाठी जेवण पाहिजे आणि जेवण उपलब्ध करावयाचे तर त्यासाठी आम्ही कमाई करावयास हवी. आमच्या जीवनभरच्या गरजा भागविण्यासाठी आम्हाला पैशांची गरज पडते. जेव्हा आम्ही आजारी पडतो, तेव्हा उपचारार्थ वेळ जातो. जर आम्हाला मुलेबाळे असली तर त्यांचे शिक्षण, खेळ आणि त्यांच्या शारीरिक व संगोपनात्मक गरजांसाठीही वेळ काढावा लागतो. यावरून असे स्पष्ट दिसू लागते की, एकांतात बसून आमच्या जीवनाबद्दल विचार करावयास आमच्याजवळ एक क्षणसुद्धा उरत नाही.

(क्रमश)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### पूर्वज आत्मा

सुरेश ओबेरॉय : बाळाने स्वत:ची प्रतिमा नकारात्मक बनवली यासाठी जर मी कारणीभूत असेन तर मी आता ती चूक निस्तरू शकतो का ?

शिवानीदीदी : तुम्ही त्याच्याशी बोलताना जे शब्द वापरता ते बदलू शकता. शब्दांबरोबरच तुम्हाला विचारांतही बदल करावा लागेल. तुमचा प्रत्येक विचार आणि शब्द हे तुमच्या बाळासाठी आशीर्वाद असायला हवेत, ते विरोधात जाता कामा नयेत. मुलाने खूप मोठी चूक केली तरीही हे असंच असायला पाहिजे कारण पुन्हा उभं राहण्यासाठी तुम्हाला त्याला ऊर्जा द्यायची आहे.आज आपल्या आयुष्यात कोणताही काळ चालू असला तरीही आज आपण कोणताही बदल करू शकतो. लहान मुलाच्या बाबतीत, आपण हे समजून घ्यायला हवं की, त्याचं नशीब तो स्वत:च्या विचारांनी घडवणार आहे, जे आपण दिलेल्या माहितीवर आधारित असणार आहे. म्हणूनच त्याच्या मनाचं प्रोग्रॅमिंग करताना आपल्याला खूपच काळजी घ्यायला हवी.जर मूल मोठं झालेलं असेल तर आपण टीका करण्याचा आपला संस्कार बदलू शकतो. त्याच्यासाठी आपण शक्तिशाली शब्दांची आणि विचारांची निवड करू शकतो. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, कोणावरही कधीही हात उचलायचा नाही असं ठरवू या. समोरच्याचं वय कितीही असलं तरीही त्याचा अपमान करायचा अधिकार आपल्याला नाही. जेव्हा आपण आपल्या मुलांना मारतो तेव्हा आपण त्यांचा अपमान करतो आणि तरीही त्याने आत्मसन्मान निर्माण करावा अशी अपेक्षा ठेवतो. अशा प्रकारे आपण आपल्याच हेतूला पराभूत करतो. जेव्हा आपण एखाद्या लहान बाळाशी बोलतो तेव्हा आपण एका आत्म्याशी बोलत आहोत हे लक्षात ठेवायला हवं. बाळाला कदाचित संवाद साधता येणार नाही कारण त्याचा मेंदू आणि इतर अवयव अजून विकसित व्हायचे आहेत, पण आत्म्याला सगळं समजतं.बाळावर हात उचलल्याने आपण आत्म्याचा अपमान करतो आणि त्याच्या आत्मसन्मानावर हल्ला चढवतो. शरीर लहान असले तरीही आत्म्याला आदरपूर्वक आणि सन्मानपूर्वक वागवा. पालकांची मुलांवर टीका करण्याची आणि संतापाची ऊर्जा त्यांना शिस्त लावण्याच्या नावाखाली तयार होते पण त्याने बाळाला मानसिक वेदना होतात. ह्या जखमा आयुष्यभर तशाच राहू शकतात.पालक आपल्या मुलाच्या बाबतीत जो विचार करतात, जे बोलतात त्यानुसार बाळ स्वत:ची प्रतिमा निर्माण करतं.

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : मी माहेरी जाते

नवरा : का?

बायको : माझं कोणी ऐकतच नाही.

नवरा : बरं ठीक आहे, मी पण येतो, तिथे तरी कोणी ऐकेल!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे (ICJ) मुख्यालय कुठे आहे?

– हेग, नेदरलँड्स

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

### तूर

उपयोग :१) सर्व प्रकारच्या कडधान्यांमध्ये तुरीला जास्त महत्त्व आहे. तिच्या चविष्ट गुणामुळे वरण, आमटीसाठी मुगापेक्षा तुरीच्याच डाळीचा वापर जास्त प्रमाणात केला जातो.

२) तूर ही अग्निप्रदीपक, रुचकर, दीपक, पाचक असल्याने ज्यांना भूक लागत नाही. तोंड बेचव झाले असेल, अशक्तपणा जाणवत असेल, तर अशा वेळी तुरीच्या डाळीपासून केलेले वरण भातासोबत खावे.

३) रोजच पोळी-भाजी खाण्याचा कंटाळा आल्यास तुरीच्या डाळीच्या वरणात गव्हाच्या पिठाची पोळी लाटून त्याच्या शंकरपाळ्याच्या आकाराचे काप करून ते वरणामध्ये फोडणी देऊन शिजवावे व या गरम गरम चकोल्या गायीचे तूप टाकून खाल्ल्यास रुचकर लागतात व सकस आहार म्हणूनही याची गणना होऊ शकते. ४) अखड्या तुरीच्या दाण्यांपासून उसळ बनविली जाते. उसळ व ज्वारीची भाकरी हा कष्टकरी लोकांचा मुख्य आहार म्हणून ग्रामीण भागात अनेक कुटुंबात घेतला जातो. तुरीमध्ये प्रथिने व जीवनसत्त्वे विपुल प्रमाणात असल्याने कष्टकरीवर्ग, गरोदर व स्तनदा माता व लहान मुले या सर्वांचेच आरोग्य चांगले राहते.

५) तुरीच्या हिरव्या शेंगा सोलून त्यातील हिरव्या दाण्यांची खमंग व रुचकर उसळ केली जाते. ही उसळ पौष्टिक असते.

६) डाळ भिजत घालून त्यात कांदा परतून, कोरडा डाळ-कांदा कधीतरी भाजीमध्ये बदल म्हणून आहारात घेता येऊ शकतो.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# डिंबे-माणिकडोह बोगद्याला राज्य सरकारची मंजुरी; तीन जिल्ह्यांतील दीड लाख हेक्टर शेतीला फायदा



नगर – गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या डिंबे ते माणिकडोह धरणांना जोडणाऱ्या सुमारे १६ किलोमीटर लांबीच्या बोगद्याच्या प्रकल्पाला राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. तसेच पुणे जिल्ह्यातील कुकडी पाटबंधारे प्रकल्पासाठी ५,७०४.५० कोटी रुपयांच्या सुधारित खर्चासही मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे कुकडी प्रकल्पातून १ लाख ४४ हजार ९१२ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होण्याचा मार्ग मोकळा झाला असून, अहिल्यानगरसह पुणे आणि सोलापूर जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. दक्षिण अहिल्यानगरचा दुष्काळी पट्टा दुष्काळमुक्त होण्यासाठी हा महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचे माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत डिंबे-माणिकडोह बोगद्याच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला हिरवा कंदील मिळाला. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न मार्गी लागल्याने कुकडीच्या डाव्या कालव्यावरील लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न अधिक भक्कम होणार आहे.

या बद्दल बोलताना डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले, दक्षिण नगर भागातील शेतकऱ्यांना दिलेली आश्वासने पूर्ण करण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचा टप्पा पार पडला आहे. साकळाई योजनेचा प्रश्न मार्गी लावल्यानंतर आता डिंबे-माणिकडोह बोगद्याचा निर्णय झाला आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न भाजप आणि आपणच मार्गी लावू, असे आश्वासन शेतकऱ्यांना दिले होते. आज राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयामुळे ते आश्वासन प्रत्यक्षात येत असल्याचा आनंद असल्याचे त्यांनी नमूद केले.

डिंबे आणि माणिकडोह ही दोन्ही धरणे कुकडी धरणमालिकेतील महत्त्वाची धरणे आहेत. माणिकडोह धरणाची क्षमता सुमारे १०.५ टीएमसी आहे. मात्र, स्थानिक पावसाच्या पाण्यावर हे धरण अपेक्षित प्रमाणात भरत नाही. दुसरीकडे, डिंबे धरण आणि त्याखालील घोड धरण भरल्यानंतर पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात अतिरिक्त पाणी खालच्या भागाकडे वाहून जाते.

या पार्श्वभूमीवर डिंबे धरणातून उपलब्ध होणारे अतिरिक्त पाणी सुमारे १६ किलोमीटर लांबीच्या बोगद्याद्वारे माणिकडोह धरणात वळविण्याची संकल्पना आहे. त्यामुळे पावसाळ्यात उपलब्ध होणाऱ्या अतिरिक्त पाण्याचा अधिक प्रभावी वापर करता येणार असून, माणिकडोह धरणाची साठवण क्षमता पूर्णपणे उपयोगात आणण्यास मदत होणार आहे. माणिकडोह धरणातील पाण्याचा मुख्य उपयोग कुकडी डावा कालवा आणि त्याखालील लाभक्षेत्रातील शेतीसाठी होणार असल्याने या प्रकल्पाचा थेट फायदा शेतकऱ्यांना मिळणार आहे.

कुकडी पाटबंधारे प्रकल्पाच्या सुधारित खर्चास ५,७०४.५० कोटी रुपयांची मान्यता मिळाल्याने प्रकल्पाच्या सिंचन क्षमतेला मोठे बळ मिळणार आहे. या माध्यमातून १,४४,९१२ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार असून, पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना त्याचा मोठा लाभ होणार आहे. कुकडी डाव्या कालव्याच्या लाभक्षेत्रातील पुणे जिल्ह्यातील जुन्नर, अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर, श्रीगोंदा व कर्जत तसेच सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यांसाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

पावसावर अवलंबून असलेल्या शेतीला नियमित पाण्याचा आधार मिळाल्यास पीक पद्धतीत बदल होण्याबरोबरच शेती उत्पादन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

## काम हवाच, पण कामवासना नको




संकलन: दिशान फिचर्स

विश्वाची निर्मिती कशी झाली? नवनिर्माण क्षमता कोठून आली? सुंदर, पवित्र, व सर्वकल्याणकारी प्रतिभा कोठे स्फुरली ? व्यर्थ अस्तित्व जाणवणाऱ्या जीवनाला अर्थ कोणामुळे लाभला? कवींनी शहाण्यांनी, विचारवंतांनी खूप चिंतन केले. मनात सतत विचार केला आणि त्यांच्या पटकन ध्यानात आले की हे काम म्हणजेच इच्छेचे कर्तृत्व होय. प्रबल इच्छा, शुभंकर इच्छा, मानवाचे कल्याण करण्याची इच्छा नवनिर्माणक्षम इच्छा, सदवृत्ती आणि समृद्धी साधणारी पवित्र, निर्मळ, निरहंकारी इच्छा, हाच काम. त्यामुळे हे सगळे साधले. ऋग्वेदाची वरील ऋचा काम शब्दाचा स्पष्ट अर्थ दर्शवितो. ती इच्छेला एक सर्वशक्तिमान असा काम म्हणते. म्हणूनच इच्छाशक्ती हीच स्थैर्याचा, भरभराटीचा, मानव कल्याणाचा, शांतता स्थापण्याचा, एकमेव आधार ठरते. छांदोग्योपनिषदही सांगते. तदैक्षत बहुस्यां प्रजायेतिती तत्ते जोडसृजत ।

त्या एकमेवाद्वितीय चैतन्याला इच्छा झाली, वाढावे, खूप निर्माण व्हावे, म्हणून मग इच्छेच्या बळावर निर्मितिक्षम, उत्पादनकेंद्रित, तेज, साहस, पराक्रम, अदभुत विक्रत निर्माण केला.

पण भगवंतांनी तर माणसाच्या अधःपतनाला काम कारणीभूत आहे असे म्हटले आहे. काम एष क्रोध एष रजोगुण समुद्रः । महाशनो, महापाप्मा, विदध्येयमिह वैरिमण।

काम, क्रोध हे महावैरी आहेत. हे दुष्ट आहेत. हे कधीही संतुष्ट होणार नाहीत. भगवंतानी हे सांगितले. पण या काम म्हणजे इच्छेला रजोगुणासमुद्धव असे विशेषण वापरले आहे. रजोगुणातून निर्माण होणारा काम, वैरी होय. स्वार्थप्रेरित, दुष्ट हेतुपूर्ण व इतरांच्या अकल्याणाचे घातक कर्म करायला प्रवृत्त करणारा काम हा वैरी होय. यालाच वासना म्हणतात. वाईट इच्छा, अकल्याणकृत काम हा वैरी होय.

इंद्राला जेव्हा अहंकार झाला, सहाय्यकर्त्यांना तुच्छ लेखू लागला, नव्हे आपल्या भक्तांवरच केवळ मदांध बनून प्रहार करायला उद्युक्त झाला, तेव्हा त्याला अपयश आले त्याचे इंद्रपद जाण्याची वेळ आली. सर्व देवादिकांहूनही मी श्रेष्ठ आहे. हा दर्प त्याला उन्मत करून बसला आहे. केवळ वासनांच्या आहारी जावून तो कर्मण्यच्युत होउ लागला. तेव्हा त्या वासना, तो काम, त्याचा वैरी ठरला जेव्हा इंद्र अविवेकाने एका वृद्ध मातेवर आईवर वज्रप्रहार करायला सरसावला, तेव्हा त्याला पळता भुई थोडी झाली, तो नउ अधिक नव्वद नद्यांच्या पलीकडे पळाला, ऋग्वेद सांगतो. नवच यत्रवचिंच खवन्तीः श्येनः न भीतः अतरःस्यासि।।

तेव्हा सदिच्छा, सत्प्रवृत्ती, उत्तम प्रेरणा या हव्यात, नवनिर्मिती, समृद्धी आणि धारणा यासाठी काम हवाच, पण कामवासना नको, समर्थ रामदास म्हणूनच म्हणाले, दुष्टकाम वाईट इच्छा नको. मग वासना दुष्टकामा न येरे। – **किशोर गांधी**

# दारूच्या नशेत तरुणावर कुंडीने जीवघेणा हल्ला; तिघांवर गुन्हा दाखल

नगर – दारूच्या नशेत विनाकारण शिवीगाळ करणाऱ्यांना समजावून सांगायला गेलेल्या तरुणाच्या डोक्यात झाडाची कुंडी घालून त्याला गंभीर जखमी केल्याची घटना भिंगार येथील महेशनगर भागात घडली.

याप्रकरणी सुरज देविदास बनसोडे (वय २६, रा. पालवे किराणा शेजारी, भिंगार) याच्या फिर्यादीवरून कॅम्प पोलीस ठाण्यात ठाकूर महेश्वर सिंग (रा. महेशनगर, भिंगार), सोमेन विश्वास आणि दिलीप दिरगोला (दोघे रा. ए. ॲण्ड. ई. आर्मी कॅम्प, अहिल्यानगर) या तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३१ ऑगस्ट रोजी रात्री पावणेअकरा वाजेच्या सुमारास स्थानिक नागरिक उपचारासाठी जात होते. त्यावेळी दारूच्या नशेत असलेल्या आरोपींनी त्यांना रस्त्यात अडवून विनाकारण अश्लील शिवीगाळ सुरू केली. हा प्रकार पाहून फिर्यादी सुरज बनसोडे आणि त्याचा भाऊ सुमित बनसोडे हे मध्यस्थी करण्यासाठी गेले. त्यांनी आरोपींना समजून सांगण्याचा प्रयत्न केला.याचा राग मनात धरून आरोपी ठाकूर महेश्वर सिंग याने तेथील झाडाची कुंडी उचलून सुमितच्या डोक्यात जोरदार मारली. या हल्ल्यात सुमित गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारासाठी तातडीने अहिल्यानगर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आरोपींनी इतरांनाही लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे आणि सहायक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# सारडा महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन जुदो स्पर्धा



मुलींची लढत लावून आंतरमहाविद्यालयीन जुदो स्पर्धेचे उद्घाटन करताना प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित. समवेत निलेश मदने, प्रा. डॉ. सतीश चोरमले, प्रा. संजय धोपावकर आदी.

नगर – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व अहिल्यानगर जिल्हा क्रीडा विभागीय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने येथील पेमराज सारडा महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन जुदो स्पर्धा पार पडली. स्पर्धेत जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमधील मुला-मुलींच्या मिळून १४ संघांनी सहभाग घेतला.

या स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी जुदो या खेळाचा महिला सक्षमीकरणासाठी होणारा उपयोग अधोरेखित केला. जुदोमधील विविध डावपेच व तंत्रे महिलांच्या स्वसंरक्षणासाठी उपयुक्त असून, महिलांमध्ये आत्मविश्वास व सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यास हा खेळ महत्त्वाची भूमिका बजावतो, असे त्यांनी सांगितले.

अहिल्यानगर कुस्ती महासंघाचे सहसचिव निलेश मदने, अहिल्यानगर जिल्हा क्रीडा विभागीय समितीचे सचिव प्रा. डॉ. सतीश चोरमले यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाचे माजी क्रीडा संचालक प्रा. संजय धोपावकर यांच्या मार्गदर्शनाखाली सदर स्पर्धा पार पडल्या. स्पर्धेसाठी पंच म्हणून शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या डॉ. मनीषा पुंडे, आंतरराष्ट्रीय खेळाडू आदित्य धोपावकर, पोलीस उपनिरीक्षक गणेश लांडगे, भूषण घाटविसावे व दातरंगे, विशाल मेहेत्रे यांनी काम पाहिले.

हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष ॲड. अनंत फडणीस, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, मानद सचिव संजय जोशी, जुनियर कॉलेज कमिटीचे चेअरमनमधुसूदन सारडा यांनी या कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. अक्षय कर्डिले यांनी केले. आभार प्रा. संजय साठे यांनी मानले.

# फिरोदिया प्रशाला, गुगळे हायस्कूलमधील गुणवंतांचा सन्मान



फिरोदिया प्रशाला व श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूलमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी दिलीप गुंदेचा, दशरथ खोसे, र. धों. कासवा, राजेश झालानी, शिवनारायण वर्मा, संतोष पिपाडा, विनोद कटारिया उपस्थित होते.

नगर – शिशु संगोपन संस्थेच्या सविता रमेश फिरोदिया प्रशाला व श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूलमध्ये विविध शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. माध्यमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या मेहनतीला संस्थेचे प्रोत्साहन, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे पाठबळ लाभल्यास शैक्षणिक क्षेत्रात निश्चितपणे मोठे यश संपादन करता येते, याचा प्रत्यय या गौरव सोहळ्यातून आला

शिशु संगोपन संस्थेच्या सविता रमेश फिरोदिया व श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूलमध्ये विविध शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा, व्हाईस चेअरमन दशरथ खोसे, सेक्रेटरी र. धों. कासवा, सहसेक्रेटरी राजेश झालानी, विश्वस्त शिवनारायण वर्मा, संतोष पिपाडा, विनोद कटारिया, माजी मुख्याध्यापक एल. के. आव्हाड, माजी प्राचार्य के. जी. गावडे, मुख्याध्यापिका योगिता गांधी, प्राचार्य दत्तात्रय कसबे आदीसह शिक्षक, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड म्हणाल्या, शिष्यवृत्ती परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेबरोबरच त्यांच्या अभ्यासातील सातत्य, वेळेचे नियोजन आणि मेहनतीची कसोटी पाहणारी परीक्षा आहे. आज मिळालेले यश हे अंतिम ध्येय न मानता भविष्यातील मोठ्या यशाची पहिली पायरी म्हणून विद्यार्थ्यांनी त्याकडे पाहावे. अडचणी आल्या तरी खचून न जाता सातत्याने प्रयत्न करण्याची वृत्ती विद्यार्थ्यांनी जोपासली पाहिजे. यशस्वी विद्यार्थ्यांच्या पाठीशी त्यांच्या पालकांचे आणि शिक्षकांचे मोठे योगदान असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी पालक व शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा योग्य उपयोग करून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधावा.

संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा म्हणाले, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देणे ही संस्थेची सातत्यपूर्ण भूमिका आहे. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशामागे त्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे योगदान आहे. विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षेतील गुणांपुरते मर्यादित न राहता ज्ञान, संस्कार, शिस्त आणि सामाजिक जाणीव यांचा समतोल साधत व्यक्तिमत्त्व विकासाकडे लक्ष द्यावे. आज सन्मानित झालेल्या विद्यार्थ्यांनी भविष्यात आपल्या शाळेचे, पालकांचे आणि संस्थेचे नाव उज्ज्वल करावे.

संस्थेचे व्हाईस चेअरमन दशरथ खोसे म्हणाले, यश मिळाल्यानंतरही विद्यार्थ्यांनी नम्रता कायम ठेवावी आणि सातत्याने नवीन ज्ञान आत्मसात करावे, असे आवाहन त्यांनी केले. गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव हा केवळ विद्यार्थ्यांचा सन्मान नसून त्यांच्या पालकांच्या आणि शिक्षकांच्या परिश्रमांचाही गौरव असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माध्यमिक विभागाचे प्राचार्य दत्तात्रय कसबे यांनी केले. सूत्रसंचालन कुलकर्णी यांनी केले. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका योगिता गांधी यांनी आभार मानले. यावेळी इयता बारावी, दहावी परीक्षांमधील गुणवंत विद्यार्थी यांचाही यावेळी सन्मान कऱण्यात आला तसेच या सर्व विद्यार्थाना मार्गदर्शन करणारे शिक्षकांचाही गौरव करण्यात आला.



भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त तरुणांनी रक्तदान केले.

# भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त रक्तदानाचा पायंडा प्रेरणादायक

नगर – भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवा-निमित्त धार्मिक कार्यासोबतच सामाजिक कार्यात जय जिव्हेश्वर प्रतिष्ठानने पुढाकार घेऊन रक्तदान शिबिराचे आयोजन केले ही कौतुकास्पद बाब आहे. सामाजिक बांधिलकी जपत प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहाने रक्तदान केले आहे. रक्तदान हेच खरे जीवनदान आहे. रक्तदानाच्या महान कार्यात सहभागी होऊन एक चांगला पायंडा जय जिव्हेश्वर प्रतिष्ठानने पाडला आहे, असे प्रतिपादन जनकल्याण रक्तकेंद्राचे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास मढीकर यांनी केले.

जय जिव्हेश्वर प्रतिष्ठान (ट्रस्ट) आणि सकल हिंदू स्वकुळ साळी समाजाच्या वतीने भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवाचे औचित्य साधून जनकल्याण रक्तपेढी, नालेगाव येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तरुणांनी सहभाग नोंदवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी जय जिव्हेश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किरण डफळ म्हणाले, रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. आपण केलेल्या रक्तदानामुळे एखाद्याचे प्राण वाचू शकतात. भगवान श्री जिव्हेश्वरांच्या जन्मोत्सवानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत आयोजित केलेले हे शिबिर समाजासाठी प्रेरणादायी आहे. तरुणांनी दाखविलेला उत्साह कौतुकास्पद आहे. याप्रसंगी किशोर विंचुरकर, राकेश गवते, प्रशांत भंडारे, संजय जठार, प्रदीप दळवी, प्रसाद कांबळे, गणेश ढाणके, वैभव जठार, सुमित ढोकळे, रोहन आकडे, योगेश पांढरपोटे, ओंकार दळवी, गणेश दळवी, शुभम झिंजे, चेतन कांबळे, धनेश्वर पाठक, श्रावण सदाफुले, अमित डाके, जनकल्याण रक्त केंद्राचे प्रशासकीय अधिकारी सागर उंडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास मढीकर, डॉ. गुलशन गुप्ता, अकाउंट ऑफिसर गजेंद्र सोनवणे, अमित टकले आदी उपस्थित होते.

# फिनिक्स क्लब चॅम्पियन टेबल टेनिस स्पर्धेत नगरच्या स्मॅश अकॅडमीचे वर्चस्व



नगर – धुळे येथील रोटरी क्लब प्रस्तुत फिनिक्स कप नॉर्थ महाराष्ट्र रीजनल चॅम्पियनशिप टेबल टेनिस स्पर्धेत नगरच्या स्मॅश अकॅडमी संघाने ४ सुवर्ण पदक,२ रौप्य पदक व २ कांस्य पदक पटकावले.

या स्पर्धा धुळे येथे २९ ते ३० ऑगस्ट रोजी पार पडल्या. या स्पर्धेत साक्षात शर्मा याने ११ वर्ष वयोगटात सुवर्ण पदक मिळविले. ईश्वरी पाटीलच्या उत्तम कामगिरीमुळे १५ वर्ष, १७ वर्ष व १९ वर्ष वयोगट मुली या तिन्ही गटात सुवर्ण पदक पटकावले. अवंती तोरडमल हिने १३ वर्ष वयोगट मुलींमध्ये रौप्य पदक जिंकले. निरवी देवळालीकरने १५ वर्ष वयोगट मुलींमध्ये रौप्य पदक मिळवले. अद्वैत जोशी याने १३ वर्ष वयोगटात कांस्य पदक मिळवले. वेदांत शितोळे याने १५ वर्ष वयोगटात कांस्य पदक मिळवले. अभिजीत ससाणे याने आपले उत्तम कामगिरी उपांत्यपूर्व फेरी पर्यंत दाखवली. निधीश भंडारे, हृदया भंडारे, आराध्य भागवत, हर्षवर्धन मोरे यांनी आपल्या खेळाने प्रेक्षकांची मने जिंकली. वरील सर्व खेळाडूंना स्मॅश टेबल टेनिस अकॅडमीचे प्रशिक्षण लाभले.

# राखी पौर्णिमेला कारागृहातील बांधवांनी घेतली व्यसनमुक्तीची सामुहिक शपथ




कारागृहातील बांधवांना राखी बांधताना डॉ. सुधा कांकरिया.

नगर – येथील रोटरी क्लब ऑफ नगर व ब्रह्माकुमारीजचे साईबन में मधुबन गीतापाठशाला व्दारे जिल्हा कारागृह अहिल्यानगर वर्ग २ कारागृहातील सर्व बांधवांना राखी बांधण्यात आली. यावेळी रोटरीच्या माजी अध्यक्षा व ब्रह्माकुमारीज् साईबन में मधुबन सेवाकेंद्राच्या संचालिका डॉ. सुधा कांकरिया यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत बंदिवानांनी व्यसनमुक्तीची, नशामुक्तीची सामुहिक शपथ घेतली.

डॉ. कांकरिया म्हणाल्या, बहिण भावाच्या पवित्र नात्याचे, स्नेह प्रेमाचे प्रतिक म्हणजे राखी. दर वर्षी राखी पौर्णिमा येते. बहिण भावाला राखी बांधते व त्याच्या दीर्घ आयुष्यासाठी आशीर्वाद देते. परंतु सध्या वातावरण बिघडले आहे. समाजामध्ये व्यसन, नशा करण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. त्यामुळे शारिरीक व मानसिक आजार वाढत चालले आहे. त्याला प्रतिबंध करण्यासाठी सर्वांनी व्यसनापासून दूर राहण्याचा निर्धार करणे आवश्यक आहे. तरी कृपया सर्वांनी व्यसनमुक्त राहण्याची प्रतिज्ञा करावी असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. सुधा कांकरिया, स्नेहल क्षीरसागर, साधना देशमुख, मंगल मुथ्था या भगिनींनी सर्वांना राखी बांधली. सुरूवातीस रोटरीचे अध्यक्ष सुहास क्षीरसागर यांनी स्वागत केले. कारागृह अधीक्षक संतोष कवार यांनी व्यसनामुळे वैयक्तिक व सामाजिक नुकसान होत असल्याचे सांगितले.

डॉ. सुधा कांकरिया यांनी राजयोगा जीवनपध्दती – मेडिटेशनचे महत्व विशद केले. मनाची शक्ती वाढण्यासाठी तसेच स्वतः मध्ये सकारात्मक परिवर्तन करण्यासाठी सर्वांनी राजयोगा मेडिटेशनचा अभ्यास करावा असे सांगत त्यांनी सर्व बंद्यांकडून मेडिटेशनचा सराव करून घेतला. शेवटी वरीष्ठ तुरूंग अधिकारी विजय सोळंके यांनी आभार मानले. यावेळेस वैद्यकिय अधिकारी डॉ. सुजाता सानप, मिश्रक हर्षल संजय रेळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी हवालदार गणेश बेरड, नंदकुमार शिंदे, समिंद्रा पवार, माधुरी धनाड, संदिप जऱ्हाड, भगवान पोटे, चंद्रशेखर आठरे आदी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# श्रावणी सोमवारी हरदिन ग्रुपचा स्वच्छतेचा जागर

## डोंगरगणच्या रामेश्वर मंदिर परिसरात वृक्षारोपण

नगर – चौथ्या श्रावणी सोमवारचे औचित्य साधून हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने डोंगरगण (ता. नगर) येथील श्री रामेश्वर महाराज मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबवून बेलाच्या झाडाची लागवड करण्यात आली. यावेळी भाविकांसाठी खिचडी व फराळ वाटप करण्यात आले. धार्मिक श्रद्धेसोबतच सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत ग्रुपच्या सदस्यांनी मंदिर परिसर स्वच्छ केला. महिलांच्या हस्ते बेलाच्या रोप लावून स्वच्छ परिसर, हरित परिसरचा संदेश देण्यात आला.



डोंगरगण येथे वृक्षारोपण करताना हरदिन मॉर्निंग ग्रुपचे सदस्य.

यावेळी हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, राजश्री राहींज, प्रांजली सपकाळ, सचिन चोपडा, डोंगरगणचे सरपंच कैलास पठारे, चेअरमन बाबासाहेब दाणे, रामेश्वर मंदिराचे विश्वस्त दत्तात्रेय पुजारी, संतोष लुनिया, जहीर सय्यद, ताराचंद ठोकळ, दीपक मेहतानी, जोगिंदरसिंग, दिलीप ठोकळ, सर्वेश सपकाळ, सुंदर पाटील, अभिजीत सपकाळ, उमाशंकर सिंग, मुन्ना वाघस्कर, योगेश चौधरी, सखाराम अळकुटे, दशरथराव मुंडे, विठ्ठल राहिंज, रामनाथ गर्जे, अनिल हळगावकर, अविनाश जाधव, राजेंद्र चंगेडिया, श्रीरंग देवकुळे, राजू शेख, शशिकांत पवार, भारत कनोजिया, सुधीर कपाळे, अशोक पराते, सुभाष पेंडुरकर, शिरीष पोटे, अविनाश पोतदार, प्रकाश देवळालीकर, रमेश वराडे, इंजि. अनिल सोळसे, राजेश तनपुरे, जालिंदर अळकुटे, दिलीप गुगळे आदी उपस्थित होते.

संजय सपकाळ म्हणाले की, हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या माध्यमातून वर्षभर जिल्ह्याच्या विविध भागांत सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबविले जातात. धार्मिक उत्सव आणि सण हे समाजाला एकत्र आणण्याचे माध्यम आहेत. त्यामुळे अशा प्रसंगी केवळ धार्मिक विधी न करता समाजासाठी काहीतरी सकारात्मक करण्याचा आमचा प्रयत्न असतो. पर्यावरणसेवा भक्ती म्हणून नागरिकांनी स्विकारावी.

सचिन चोपडा म्हणाले की, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षसंवर्धन अत्यंत महत्त्वाचे आहे. आज लावलेले एक रोप भविष्यात शेकडो भाविकांना सावली देईल, पक्ष्यांना आसरा देईल आणि परिसराचे सौंदर्य वाढवेल. त्यामुळे धार्मिक भावना आणि सामाजिक जबाबदारी यांची सांगड घालणारे उपक्रम सातत्याने होणे गरजेचे आहे. हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या माध्यमातून अशा उपक्रमांना मिळणारा प्रतिसाद उत्साह वाढविणारा असल्याचे ते म्हणाले. सरपंच कैलास पठारे म्हणाले की, हरदिन मॉर्निंग ग्रुपचे सामाजिक कार्य कौतुकास्पद आहे. जिल्ह्यात वर्षभर विविध ठिकाणी स्वच्छता, वृक्षारोपण, अन्नदान आणि सामाजिक प्रबोधनाचे उपक्रम राबवून ग्रुपने सेवाभावाची वेगळी ओळख निर्माण केली आहे. डोंगरगणच्या रामेश्वर महाराज मंदिर परिसरात श्रावणी सोमवारच्या दिवशी स्वच्छता अभियान आणि वृक्षारोपण करून त्यांनी धार्मिक उत्सवाला सामाजिक कार्याची जोड दिली आहे.

डोंगरगण येथील श्री रामेश्वर महाराज मंदिराच्या वतीने हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ तसेच सर्व सदस्यांचा सत्कार करण्यात आला.



सखाराम मेहेत्रे प्राथमिक विद्यालय व केशवराव गाडीलकर हायस्कूलमध्ये पासवर्ड मासिकाचे वाटप करताना मान्यवर.

# मेहेत्रे विद्यालय व गाडीलकर हायस्कूल मध्ये पासवर्ड मासिकाचे वाटप

नगर – मोबाईल मध्ये गुंतलेल्या विद्यार्थ्यांत वाचनाची गोडी वाढावी त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळावा ज्ञान वाढावे यासाठी सखाराम मेहेत्रे प्राथमिक विद्यालय व केशवराव गाडीलकर हायस्कूलमध्ये जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या प्रेरणेतून आणि उद्योजक राजेंद्र शिंदे यांच्या सहकार्याने दोन्ही विद्यालयात पासवर्ड मासिकाचे वाटप करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व सांगण्यात आले पासवर्ड मासिकाच्या वाटप प्रसंगी वृषाली जोगळेकर आणि सौ वसुधा बोरकर यांनी भारुड गीतातून मोबाईल का नको आणि पासवर्ड का ते विद्यार्थ्यांशी संवाद साधत सोप्या खेळातून मासिकातील उपक्रमांची ओळख करून दिली.

यावेळी विस्तार अधिकारी राधाकिसन शिंदे यांनी विद्यार्थ्यांना वाचाल तर टिकाल आणि त्यासाठी पासवर्ड नक्कीच मदत करेल असे सांगितले. सावेडी केंद्राचे समन्वयक अरुण पालवे यांनीही मोबाईलच्या प्रत्येक अँप ला पासवर्ड दिल्याशिवाय तो उघडत नाही त्याप्रमाणे आपल्या मेंदूलाही सहज सोप्या कृतींचा खुराक पुरवणारे पासवर्ड मासिक नक्कीच ज्ञानाचे भांडार खुले करणारे पासवर्ड असल्याचे म्हटले.

कार्यक्रमास गटशिक्षणाधिकारी महंमद शेख तसेच सावेडी केंद्राचे समन्वयक अरुण पालवे, संस्थेचे सचिव नामदेवराव गाडीलकर आणि माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल गायकवाड प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. जयश्री लांडे तसेच दोन्ही विद्यालयाच्या शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, विद्यार्थी, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. संगीता बोराटे यांनी केले.

# वीर गोगादेव जन्मोत्सवानिमित्त मानाच्या नाथांची मिरवणूक

नगर – साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने द्वारकामाई साई मंदिर (संदेशनगर, वसंत टेकडी) येथे १३ वा जय वीर गोगादेव जन्मोत्सव सोहळा अत्यंत उत्साहात आणि अलोट गर्दीत पार पडला. आमदार संग्राम जगताप यांच्या खंबीर मार्गदर्शनाखाली झालेल्या या सोहळ्याने संपूर्ण अहिल्यानगर शहराचे लक्ष वेधून घेतले. उत्सवाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या शहरातील १३ मानाच्या नाथांचे आगमन होताच अवघा परिसर जय वीर गोगादेव आणि साईरामच्या जयघोषाने दुमदुमून गेला.



मिरवणूक एकवीरा चौक, श्रीराम चौक मार्गे मार्गस्थ होत वसंत टेकडी येथील द्वारकामाई साई मंदिरापर्यंत पोहोचली. मिरवणुकीच्या संपूर्ण मार्गावर नाथांच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी आणि स्वागतासाठी अबालवृद्धांनी मोठी गर्दी केली होती. मिरवणूक मंदिरात पोहोचल्यानंतर राहुरीचे आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते साईबाबांची आणि वीर गोगादेवांची भावपूर्ण महाआरती करण्यात आली. महाआरतीनंतर उपस्थित हजारो भाविकांना शिस्तबद्ध पद्धतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

या सोहळ्याप्रसंगी माजी नगरसेवक सुनील त्र्यंबके, नगरसेविका रोशनी त्र्यंबके, नगरसेवक निखिल वारे, नगरसेवक बाळासाहेब पवार, नगरसेवक महेश तवले यांसह संपूर्ण त्र्यंबके परिवार आणि परिसरातील नागरिक, महिला व भाविक उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली हा जन्मोत्सव सोहळा भव्य स्वरूपात यशस्वी करता आल्याचे सांगताना माजी नगरसेवक सुनील त्र्यंबके म्हणाले, एकवीरा चौकापासून सुरू झालेल्या मिरवणुकीत १३ मानाच्या नाथांचे लाभलेले सानिध्य, भजनाचा गजर आणि अहिल्यानगरकरांनी दिलेली साथ आमच्या पाठीवर कौतुकाची थाप देणारी आहे. आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते झालेली महाआरती आमच्यासाठी आनंदाचा क्षण होता. आलेल्या प्रत्येक भाविकाला सन्मानाने महाप्रसाद मिळावा, यासाठी आमच्या कार्यकर्त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले, असे त्यांनी सांगितले.

# शोभायात्रा काढून संत सेना महाराज पुण्यतिथी साजरी

### महाप्रसादाने उत्सवाची सांगता

नगर – सकल नाभिक समाज, अहिल्यानगर यांच्या वतीने श्री संत शिरोमणी सेना महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा ८ सप्टेंबर रोजी विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. सकाळी नगरकर नाभिक पंचाचा वाडा येथे संत सेना महाराजांच्या मूर्तीवर विधिवत अभिषेक करण्यात आला. भजन, पूजन व आरतीने परिसर भक्तिमय झाला. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने संत सेना महाराजांचे दर्शन घेतले. धार्मिक कार्यक्रमानंतर सकाळी ९ वाजता पालखी व भव्य शोभायात्रेला प्रारंभ झाला.



संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त पालखी मिरवणूक काढण्यात आली. (छाया – विजय मते)

नगरकर नाभिक पंचाचा वाडा येथून सुरू झालेली शोभायात्रा पानसरे गल्ली, अर्बन बँक चौक, नवी पेठ, नेता सुभाष चौक, लक्ष्मी कारंजा मार्गे गायत्री मंदिर, महाजन गल्ली येथे पोहोचली. शोभायात्रेत टाळकरी मंडळी, हिंदवी शौर्य ढोलपथक, विविध वाद्यपथक तसेच वारकरी समाजबांधव सहभागी झाले होते. ढोलपथकाच्या गजराने आणि टाळ–मृदंगाच्या भक्तिमय निनादाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. संत सेना महाराजांच्या जयघोषात निघालेल्या या शोभायात्रेमुळे शहरातील वातावरण भक्तिमय झाले होते.

शोभायात्रेत नाभिक समाजातील महिला, पुरुष, युवक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेले टाळकरी व वारकरी, ढोलपथकाचे आकर्षक सादरीकरण आणि पालखीचे दर्शन घेण्यासाठी मार्गावर जमलेले भाविक यामुळे शोभायात्रेला विशेष आकर्षण प्राप्त झाले. अनेक ठिकाणी नागरिकांनी पालखीचे स्वागत करून संत सेना महाराजांचे दर्शन घेतले.

शोभायात्रेनंतर गायत्री मंदिर, महाजन गल्ली येथे मान्यवरांच्या उपस्थितीत मुख्य कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहिल्यानगरचे आ. संग्राम जगताप होते. यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, स्थायी समिती सभापती सुभाषभाऊ लोंढे, नितीन पोटलाशेरू, बाळ बोठे, स्नेहदीप हॉस्पिटलचे डॉ. प्रदीप इंगळे, नगरसेविका आशाताई डागवाले, सुनिता गेनापा, मयुरी जाधव, नगरसेवक सागर मुर्तुडकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या उत्सवासाठी बाळासाहेब भुजबळ, माऊली गायकवाड, संदीप शिंदे, बापू औटी, आशिष ताकपिरे, बबन काशीद, सागर शेळके, सुशील थोरात, आर. के. साळुंखे, संतोष यादव, शुभम राऊत, संदीप राऊत, संपत मदने, दादा मदने, सुधाकर काशीद, बाबुराव ताकपिरे, लालू काशीद, संतोष जाधव, सौरभ शिंदे आदींनी परिश्रम घेतले. मुख्य कार्यक्रमानंतर गायत्री मंदिर, महाजन गल्ली येथे भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# ‘आयकॉन’च्या विद्यार्थ्यांनी साकारलेल्या स्मार्ट रोड सेफ्टी उपकरणाला प्रथम क्रमांक

नगर – रस्ते सुरक्षेच्या गंभीर प्रश्नावर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अभिनव उपाय शोधत द आयकॉन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी विकसित केलेल्या पुषण या स्मार्ट रस्ते सुरक्षा उपकरणाने आंतरशालेय उत्पादन विकास स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला.

एसआरईएफ स्कूल येथे आयोजित या स्पर्धेत विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि तंत्रज्ञान आधारित दृष्टीकोनाला विशेष दाद मिळाली. पुषण ही स्मार्ट हेल्मेट ओळख आणि प्रज्वलन नियंत्रण प्रणाली आहे. दुचाकीस्वाराने हेल्मेट परिधान केले आहे की नाही, हे या प्रणालीद्वारे ओळखले जाते. हेल्मेट परिधान केले असेल तरच दुचाकी सुरू होते; हेल्मेट नसल्यास वाहन सुरू होत नाही. हेल्मेट नाही तर वाहन सुरू नाही हा या अभिनव प्रकल्पाचा मुख्य संदेश आहे. सौरिश अग्रवाल (इ.९वी) आणि हर्षवर्धन महाडिक (इ. ८ वी) या विद्यार्थ्यांनी सदर उपकरण साकारले.

या नाविन्यपूर्ण उत्पादनाला पुषण हे नाव देण्यात आले आहे. वैदिक परंपरेत पूषण हे रस्ते, प्रवास आणि प्रवाशांच्या संरक्षणाशी संबंधित देवता मानली जाते. प्रकल्पाचे नाव आणि त्यामागील उद्देश यांचा सुंदर मेळ साधण्यात आला आहे. वाहतूक नियम असूनही अनेक दुचाकीस्वारांकडून हेल्मेट वापरले जात नाही. ही बाब ओळखून विद्यार्थ्यांनी केवळ जनजागृती न करता तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सुरक्षित वर्तनाला प्रोत्साहन देणारा प्रत्यक्ष उपाय विकसित करण्याचा प्रयत्न केला. त्यातून पुषणची संकल्पना साकार झाली. या प्रकल्पाच्या निर्मिती प्रक्रियेत विद्यार्थ्यांना संकल्पना विकास, मॉडेल निर्मिती, इलेक्ट्रॉनिक्स, डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष वापर आणि उत्पादन विकास यांचा अनुभव मिळाला. या प्रकल्पासाठी शिक्षक अजय खजिनदार आणि प्राची गिरधर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा मंगला मुथा, चेअरमन अशोक मुथा, संचालक (प्रशासन) कर्नल आर. सी. राणा, आराधना राणा, ट्रस्टी निर्मल मुथा, अमित मुथा, प्राचार्या दीपिका नगरवाला आदींनी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले.



पुषण या स्मार्ट रस्ते सुरक्षा उपकरणासह आयकॉन पब्लिक स्कूलचे विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक.

# आनंदधाम येथे २०२७ मध्ये चैतन्यश्रीजी म.सा. यांचा चातुर्मास

नगर: राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांची तपोभूमी असलेल्या अहिल्यानगरमध्ये पुढील वर्षी २०२७ मध्ये प.पू. गणेशलालजी म.सा., प.पू. मिश्रीलालजी म.सा., प.पू. प्रभाकंवरजी म.सा. यांच्या अनुयायी जिनशासन प्रभाविका पूज्य चैतन्यश्रीजी म.सा. आदी ठाणा ४ यांचा आनंदधाम येथे चातुर्मास होणार आहे.



महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी महाराज यांच्या आज्ञेने व श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ, अहिल्यानगर यांच्या विनंतीवरून पूज्य चैतन्यश्रीजी म.सा. यांनी चातुर्मासासाठी तात्विक मान्यता दिली आहे. पूज्यश्रुतमुनीजी म.सा. पुढील महिन्यात मद्रास येथून या चातुर्मासाची अधिकृत घोषणा करतील, अशी माहिती जैन श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमलजी मुनोत व सेक्रेटरी संतोष बोथरा यांनी दिली.

पूज्य चैतन्यश्रीजी म.सा. यांच्या समवेत मधुर गायिका पूज्य जिज्ञासाश्रीजी म.सा., अध्ययनशील पूज्य सुबोधीजी म.सा., ज्ञान पिपासू पूज्य निर्मितीप्रभाजी म.सा. असतील. पूज्य चैतन्यश्रीजी म.सा. यांचा २०२६ चा चातुर्मास सध्या छत्रपती संभाजीनगर येथे सुरू आहे. नगरमधील श्रावक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी महाराज यांच्या आज्ञेने छत्रपती संभाजीनगर येथे जाऊन पूज्य चैतन्यश्रीजी म.सा. यांना नगरमधील चातुर्मासासाठी विनंती केली.

आनंदधाम येथे हा चातुर्मास होणार आहे. गुरूवर्यांच्या पावन सान्निध्याचा आणि अनमोल मार्गदर्शनाचा लाभ नगरमधील भाविकांना पुढील वर्षी चातुर्मासात मिळणार आहे. या चातुर्मासाच्या घोषणेने नगर संघात आनंदी वातावरण तयार झाले आहे, असे श्रावक संघाचे सहसेक्रेटरी संतोष गांधी, उपाध्यक्ष आनंदराम मुनोत व सतीश लोढा यांनी सांगितले.



### मोरया युवा प्रतिष्ठानच्या वतीने श्री बेलेश्वर महापालखीचे स्वागत

मोरया युवा प्रतिष्ठानच्या वतीने श्री बेलेश्वर महापालखीचे हातमपुरा येथे स्वागत करून प्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी ईश्वर पवार, स्वामी टाकळकर, शुभम टाकळकर, अमित सोनग्रा, दर्शन चानोदिया, हिमांशू साखला, सागर शर्मा, अंकुश गोयल, खुशाल पवार आदि उपस्थित होते.

# भाजप अनुसूचित जाती मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी मनेष साठे यांची नियुक्ती

नगर – भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी २०२६ ची घोषणा माननीय प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण यांनी जाहीर करण्यात आली असून, प्रदेश महामंत्री माधवी नाईक अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष विश्वजीत गायकवाड यांच्या नेतृत्वात कार्यकारणी जाहीर करण्यात आली. अहिल्यानगर शहरातील भारतीय जनता पार्टीचे निष्ठावंत कार्यकर्ते व माजी स्थायी समिती सभापती मनेश दशरथ साठे यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



मनेश साठे यांनी पक्षाच्या माध्यमातून सामाजिक व संघटनात्मक कार्यात सक्रिय सहभाग घेतला असून, त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांच्यावर महाराष्ट्र प्रदेश अनुसूचित जाती मोर्चाच्या उपाध्यक्षपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

नवीन जबाबदारीच्या माध्यमातून अनुसूचित जाती समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासोबतच समाजातील युवकांना संघटित करून पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी आपण प्रभावीपणे कार्य करणार असल्याचे मनेश साठे यांनी सांगितले.त्यांच्या नियुक्तीबद्दल पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील ,विधान परिषद अध्यक्ष प्रा राम शिंदे तसेच आमदार व माजी खासदार, जिल्हा प्रमुख आदींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# ‘जायंटस् वेलफेअर फौंडेशन’ ची कौन्सिल सभा उत्साहात

नगर – जायंट्स वेलफेअर फौंडेशन फेडरेशनची तिसरी कौन्सिल सभा छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. फेडरेशनच्या कार्याचा आढावा, विविध सामाजिक उपक्रमांना चालना देणे, ग्रुप व सदस्यवृद्धी तसेच आगामी उपक्रमांच्या नियोजनावर यावेळी चर्चा करण्यात आली.



चितळे उद्योग समूहाचे मुख्य संचालक व जायंटस् सेंट्रल कमिटी सदस्य गिरीश चितळे यांचे स्वागत करताना स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे. समवेत विजय चौधरी, ॲड. विलास पवार, डॉ. सतीश बापट, डॉ. अनिल माळी, जगदीश हरकूट आदी.

यावेळी चितळे उद्योग समूहाचे मुख्य संचालक तथा जायंट्स सेंट्रल कमिटी सदस्य गिरीश चितळे यांनी मार्गदर्शन करताना जायंट्स ही केवळ एक संस्था नसून एक परिवार असल्याचे सांगितले. प्रत्येक ग्रुपने आपल्या कार्याचा विस्तार करण्याबरोबरच ग्रुप वृद्धी आणि सदस्य वृद्धीवर विशेष भर देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. आगामी बेंगळुरू कन्व्हेन्शनमध्ये जास्तीत जास्त संख्येने सदस्यांनी सहभागी होण्यासाठी रजिस्ट्रेशन करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे यांनी अहिल्यानगर जायंट्स ग्रुपच्या कार्याचा आढावा मांडला. अहिल्यानगर ग्रुपने गेल्या ४० वर्षांपासून शहरामध्ये विविध सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य उभे केले आहे, असे त्यांनी सांगितले. समाजसेवेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवत जायंट्सने सामाजिक चळवळ म्हणून आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली असून, समाजसेवेत ही संस्था नेहमीच अग्रेसर राहिली आहे. भविष्यातही फेडरेशनच्या मार्गदर्शनाखाली विविध सामाजिक उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासोबतच सदस्यवृद्धीसाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे गुगळे यांनी स्पष्ट केले.

या संयुक्त कौन्सिल सभेस जायंट्सचे विश्व उपाध्यक्ष विजयकुमार चौधरी, डॉ. सतीश बापट, डॉ. अनिल माळी, विलास पवार, फेडरेशन अध्यक्ष जुगलकिशोर हरकूट, विनोद शेवटेकर, सूर्यमाला मलानी, फेडरेशनच्या उपाध्यक्षा संतोषी भालेराव, रत्नाकर महाजन, डायरेक्टर अनघा आंबेकर, सुमित गुप्ता, नरेश गुप्ता, दिलीप सावजी, बळवंत शिंदे, राजदत्त राजपूत आदी कौन्सिल सदस्य उपस्थित होते.

सभेच्या आयोजनाची जबाबदारी पायोनियर ग्रुपने घेतली होती. पायोनियर ग्रुपचे अध्यक्ष अजय अग्रवाल, सचिव अनुप अग्रवाल, अमित मलानी, विनोद अग्रवाल, शीतल अग्रवाल आणि सारिका मलानी यांनी सभेचे नियोजन व आयोजन केले. सचिव सन्मती जैन यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# फ्रॅक्चर पाय, शस्त्रक्रिया हृदयाची!



खासगी रुग्णालयामध्ये एक अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आला असून या प्रकरणाची चौकशीही सुरू करण्यात आली आहे. पाय फ्रॅक्चर झाल्यामुळे उपचारांसाठी दाखल केलेल्या महिलेच्या हृदयाचे ऑपरेशन डॉक्टरांनी केले. पायाचे हाड तुटलेले असल्याने रुग्णालयात भरती झालेल्या या महिलेच्या हृदयामध्ये डॉक्टरांनी ऑपरेशन करुन 'स्टेंट' बसवला. आश्चर्याची गोष्टमध्ये हे ऑपरेशन करण्याआधी कुटुंबीयांना याविषयी कोणतीही माहिती देण्यात आली नव्हती. तसेच कुटुंबीयांची कोणत्याही प्रकारची संमती रुग्णालयाने घेतली नव्हती, असा आरोप महिलेच्या नातेवाइकांनी केली आहे. ऑपरेशन झाल्यानंतर काही वेळाने या महिलेचा मृत्यू झाला असून पोलिसांनी डॉक्टरांविरुद्ध एफआयआर दाखल केला असून चौकशी सुरू केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना हरियाणातील पानिपतमधील जीटी रोडवरील 'पार्क हॉस्पिटल'मध्ये घडली आहे. मयत महिलेचे नाव गुड्डी देवी असे आहे.

कुटुंबीयांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार, मूळच्या उत्तर प्रदेशातील कानपूर देहात येथील रहिवासी असलेल्या आणि सध्या रमेश नगरमध्ये राहणाऱ्या गुड्डी यांचा अपघात झाला. २४ जुलै रोजी झालेल्या या रस्ते अपघातात गुड्डी यांचा पाय मोडला. त्यानंतर त्यांना ऑर्थोपेडिक ट्रीटमेंटसाठी 'पार्क हॉस्पिटल'मध्ये दाखल करण्यात आले. खासगी रुग्णालयात दाखल केल्यास चांगले उपचार मिळतील अशी त्यांच्या कुटुंबीयांना अपेक्षा होती; मात्र घडले अगदी उलट! गुड्डी देवी यांचा मुलगा कुलदीपने केलेल्या दाव्यानुसार, त्याच्या आईवर हृदयाची शस्त्रक्रीया करण्यात आली. हृदयाशी संबंधित ऑपरेशन प्रोसिजर पूर्ण झाल्यानंतरच डॉक्टरांनी गुड्डी देवींच्या हृदयामध्ये स्टेंट बसवल्याचे सांगितल्याची माहिती कुलदीपने दिली आहे. दाखल करण्यात आलेल्या तक्रारीनुसार, ऑपरेशन करण्यापूर्वी कुटुंबीयांचा सल्ला घेतला गेला नाही किंवा त्यांची संमतीही घेतली गेली नाही. कुलदीपने असाही आरोप केला, की हृदयाशी संबंधित या प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या संमती पत्रावर बनावट सह्या करण्यात आल्या. गुड्डी देवी यांना हृदयाशी संबंधित काही आजार आहे आणि त्यावर त्वरित उपचारांची गरज आहे, अशी कोणतीही माहिती कोणत्याही डॉक्टरने किंवा रुग्णालयाच्या अधिकाऱ्याने आम्हाला दिली नव्हती, असेही कुलदीपने म्हटले आहे. त्याऐवजी, हृदयाशी संबंधित ऑपरेशन पूर्ण झाल्यानंतरच कुटुंबातील सदस्यांना त्याबद्दल समजले. कुटुंबीयांनी रुग्णालयावर वैद्यकीय निष्काळजीपणा, फसवणूक आणि अनावश्यक वैद्यकीय प्रक्रिया केल्याचा आरोप केला आहे. गरज नसताना केलेल्या उपचारामुळेच माझ्या आईचा मृत्यू झाला आहे, असे कुलदीपने म्हटले आहे. गुड्डी देवी यांच्या मृत्यूनंतर रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी कुटुंबीयांना धमकावल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

# नातं पक्षी आणि माणसांचं

कर्नाटकमधल्या मांड्या जिल्ह्यातल्या कोक्केरबेल्लूर गावात अनोखे पाहुणे येतात आणि गावातले लोक या पाहुण्यांची सरबराई करण्यात मग्न होतात. थंडीच्या दिवसात या गावात स्थलांतरित पक्षी येतात आणि इथले लोक या पक्ष्यांची आपल्या मुलींप्रमाणे देखभाल करतात. या पक्ष्यांना मुली तर त्यांच्या पिलांना नातवंड मानून सेवा केली जाते. पेलिकन आणि पेंटेड स्टॉर्कसारखे स्थलांतरित पक्षी या ठिकाणी येतात. हे पक्षी माहेरपणासाठी आले आहेत असंच इथले लोक मानतात. पेलिकन प्रजातीचे पक्षी ऑक्टोबर महिन्यात या गावात दाखल होतात. इथेच हे पक्षी अंडी घालतात. अंड्यांमधून पिल्लं बाहेर येतात. ही पिल्लं एप्रिलपर्यंत उडायला शिकतात. मगच हे पक्षी इथून जातात. बाळंतपणासाठी आलेल्या या मुलींना इथले लोक खूप जपतात. पेंटेड स्टॉर्क जातीचे पक्षी जुलै महिन्यापर्यंत इथे राहतात. पक्षी आणि गावकऱ्यांचं हे नातं पिढ्यानपिढ्यांचं आहे. जवळपास २०० वर्षांपूर्वीपासून गावात ही परंपरा सुरू झाली. आजही इथे परंपरेचं पालन केलं जातं. गावकरी या पक्ष्यांच्या अस्तित्वाला शुभ मानतात. या पक्ष्यांच्या तसंच त्यांच्या पिल्लांच्या सुरक्षेची पूर्ण काळजी घेतली जाते. झाडांवर बांधलेल्या घरट्यांमधून पक्ष्यांची पिल्लं जमिनीवर पडू नयेत यासाठी झाडांखाली जाळ्या बांधल्या जातात. गावकऱ्यांसोबत प्रशासनही हे काम करतं. हे पक्षी मासे खातात.. जवळच्या नदीवर जाऊन ते आपलं अन्न मिळवतात. गावकरी आणि या पक्ष्यांचं हे नातं अनोखंचं म्हटलं पाहिजे.



# कॅलिडोस्कोप



## जंतर मंतरवर जुळल्या रेशीमगाठी!

दिल्लीतल्या जंतर-मंतर याठिकाणी झालेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनात एखाद्याची 'लव्ह-स्टोरी' सुरू होईल, याची कोणी कल्पनाही केली नसेल; पण प्रत्यक्षात असे घडले. नीट पेपरफुटीप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन करायला गेलेल्या बिहारच्या मुलाने दिल्लीच्या मुलीशी लग्न केले आहे.

या दोघांच्या प्रेमकहाणीत जंतर-मंतरवरील आंदोलनाचा खूप मोठा वाटा आहे. कारण याच आंदोलनात दोघे एकमेकांच्या प्रेमात पडले. 'सोशल मीडिया'वर सध्या या जोडप्याचा व्हिडीओ तुफान व्हायरल होत आहे. या दोघांची कहाणी कोणत्याही 'फिल्मी स्टोरी'पेक्षा कमी नाही. बिहारचा मोहन श्रीवास्तव जंतर-मंतर याठिकाणी आंदोलन करत होता. आंदोलनाच्या ठिकाणी खाण्यापिण्याची कोणतीच सोय नसताना दिल्लीतली एक तरुणी त्याच्यासाठी सतत काही ना काही खायला आणत होती. कधी लौंगलता, कधी सिंघाडा.. असे दररोज काही ना काही ती खायला आणायची आणि मलाच द्यायची, असे मोहनने सांगितले.

एकेदिवशी मोहन तिला म्हणाला, 'फक्त खायलाच देशील का, पाणी कोण देणार?' तेव्हा ती तरुणी हसली आणि दुसऱ्याच दिवशी पाण्याची मोठी बाटली मोहनसाठी घेऊन आली. तेव्हा दोघांमध्ये जंतर-मंतर याठिकाणीच काही गप्पागोष्टी झाल्या. विशेष म्हणजे त्या तरुणीनेही 'नीट'ची परीक्षा दिली होती. म्हणूनच ती आंदोलनात सहभागी होण्यासाठी तिथे गेली होती.

# लग्नातच घेतला सूड



मंडप सजवलेला आहे. वधू-वर स्टेजवर बसलेले आहेत आणि लग्नातील सर्वात महत्वाचा क्षण आला आहे, कुंकू लावण्याचा. पण कुंकू उचलताच वधूचा विचार बदलतो. ती त्याच्याकडे पाहते आणि म्हणते, कृपया कुंकू लावताना काळजी घे. ते माझ्या चेहऱ्यावर पडले तर काय होईल याचा विचार कर. वर थोडा वेळ घाबरतो. नंतर हसत हसत म्हणतो हो बाळा आणि अगदी हळूवारपणे कुंकू लावण्याचा प्रयत्न करतो. तो एक छोटीशी चूक करतो आणि वधूच्या गालावर थोडे कुंकू पडते. आतापर्यंत शांत बसलेली वधू पुढच्याच क्षणी रुद्रावतार धारण करते. एकही क्षण वाया न घालवता, ती वराच्या हातातून कुंकवाची पेटी हिसकावून घेते आणि जणू सूड घेत असल्याप्रमाणे त्याच्या चेहऱ्यावर घासते. आतापर्यंत सात फेरे घेऊन सात जन्मांचे स्वप्न पाहणारा गरीब वर आता कुंकवाने माखलेल्या चेहऱ्याने शांत, असहाय्य आणि आश्चर्यचकित होऊन उभा असतो.




# ... होतील ५६ हजार नवीन तलाव?

जगात दोन लाख ते दोन लाख पंचवीस हजार हिमनद्या आहेत. यामध्ये जगातील एकूण पाण्यापैकी ६९ टक्के पाणी सामावलेले आहे. ऑस्ट्रेलिया वगळता प्रत्येक खंडात या हिमनद्या आढळतात. आर्क्टिक, अलास्का, अंटार्क्टिका, तसेच हिमालय आणि अँडीजसारख्या पर्वतरांगांमध्ये त्या मोठ्या संख्येने आहेत. हवामान बदलामुळे या हिमनद्या वितळू शकतात. यामुळे आशियासह अनेक देशांमध्ये महापूर येऊ शकतो. हिमालयातील बर्फ वितळून पृथ्वीवर ५६ हजार नवीन तलाव तयार होतील अशी भीती व्यक्त केली जात आहे.

'नेचर कम्युनिकेशन्स'मध्ये एक लेख प्रसिद्ध झाला आहे. स्वीडन, अमेरिका, स्वित्झर्लंड आणि नॉर्वे येथील संशोधकांनी पृथ्वीवरील सर्व हिमनद्यांखालील जमिनीचा नकाशा तयार केला. यावरून त्यांनी एक धक्कादायक निष्कर्ष काढला आहे. या संशोधनाबाबतची माहिती या लेखात आहे. या हिमनद्यांमधील बर्फ वितळून पृथ्वीवर ५६ हजार नवीन तलाव तयार होतील. ते सध्या पूर्णपणे गोठलेल्या तलावांची जागा घेतील अशी भीती संशोधकांनी व्यक्त केली आहे. स्वीडनमधील उपसाला विद्यापीठ, अमेरिकेतील कार्नेगी मेलन विद्यापीठ, स्वित्झर्लंडमधील लॉझान विद्यापीठ आणि नॉर्वेमधील ओस्लो विद्यापीठातील संशोधकांच्या एका पथकाने ग्रीनलँड आणि अंटार्क्टिकाच्या मोठ्या बर्फाच्या आवरणाबाहेर असलेल्या हिमनद्यांचे विश्लेषण केले. हिमनद्यांखालील जमिनीची रचना निश्चित करण्यासाठी, त्यांनी जीपीयू (जीपीयू) आणि डीप लर्निंगवर आधारित 'इन्स्ट्रक्टेड ग्लेशियर मॉडेल' नावाच्या त्रिमितीय बर्फ प्रवाह मॉडेलचा वापर केला. हिमनद्या पूर्णपणे नाहीशा झाल्या, तर पृथ्वीचा पृष्ठभाग कसा दिसेल हे समजून घेणे हा या विश्लेषणाचा उद्देश होता. याचा शोध घेणे फारच कठीण आहे. कारण हिमनद्यांचा तळ थेट दिसत नाही आणि त्यात खोल दऱ्या, खळगे, नैसर्गिक खोरे आणि वितळलेले पाणी साचू शकणारी क्षेत्रे लपलेली असू शकतात. भविष्यात किमान ०.०५ चौरस किलोमीटर क्षेत्रफळाची ५६ हजार ६५९ अशी सरोवरे तयार होऊ शकतात. ही भविष्यातील सरोवरे ४०,६४७ चौरस किलोमीटर क्षेत्र व्यापू शकतात. ३,१३८ घन किलोमीटरपर्यंत पाणी साठवू शकतात. हे प्रमाण समुद्राच्या पातळीत ७-मिलीमीटर वाढीच्या समतुल्य आहे. ते पाणी थेट महासागरात वाहून जाण्याऐवजी या नैसर्गिक जलाशयांमध्ये तात्पुरते साठवले जाईल. नव्याने बर्फमुक्त झालेल्या जमिनीपैकी सहा टक्के जमीन सरोवरांनी व्यापली जाऊ शकते. या अभ्यासात हिमालय, काराकोरम, हिंदुकुश, पामीर आणि तियान शान पर्वतरांगांसह आशियातील उंच पर्वतीय प्रदेश असुरक्षित असल्याचे ओळखले गेले आहे.भारत, पाकिस्तान, पेरू आणि चीनसह अंदाजे १.५ कोटी लोकांचा जीव धोक्यात आहे. हिमनदीच्या सरोवरांमधून येणाऱ्या अचानक पुराचा संभाव्य धोका आहे. या अभ्यासात उंच पर्वतीय आशिया हा सर्वाधिक धोका असलेला प्रदेश असल्याचे ओळखले गेले आहे.

# हनिमूनच्या रात्रीच संशय



लग्न हे नातं विश्वासावर अधिक खुलतं. नववधू लग्न होऊन सासरी जाते तेव्हा ती फक्त एका व्यक्तीवर विश्वास ठेवते. पण तीच व्यक्ती विश्वासाला तडा देते तेव्हा... असाच काहीसा प्रकार एका जिल्ह्यात घडला आहे. हनिमूनच्या रात्री नवरीला चक्कर आली तर नवऱ्याने थेट तिला प्रेग्नेंसी टेस्ट किट दिली. हे बघून नववधू चांगलीच भडकली. एवढंच नाही तर तिने थेट माहेरी फोन करुन हा प्रकार सांगितला. यानंतर नववधूच्या माहेरच्यांनी थेट सासर गाठलं.

एका तरुणाचं पारंपरिक पद्धतीने लग्न झालं. वरात घरी पोहोचायला संध्याकाळी झाली. दिवसभराचा शीण आणि लग्नाचा ताण यामुळे नववधूला चक्कर आली. हा सगळा प्रकार बघताच वर घाबरला. त्याने हा सगळा प्रकार आपल्या मित्रांना सांगितला. तेव्हा मित्रांनी मस्करीत म्हटलं की, ही तर सगळी गरोदर असण्याची लक्षणे आहेत. या गोंधळात वर रात्रीच गावाबाहेरच्या मेडिकलमध्ये गेला आणि प्रेग्नेंसी टेस्टचं किट विकत घेऊन आला.

हनिमूनच्या दिवशी नवऱ्याने नववधूला किट दिलं आणि टेस्ट करायला सांगितलं. हा सगळा प्रकार बघून नववधू हैराण झाली आणि तिने थेट आपल्या वहिनीला फोन केला. आपला नवरा आपल्यावर संशय घेत असल्याचं सांगितलं. एवढंच नव्हे, तर या आधी तुझा कुणासोबत संबंध होता का? असंदेखील विचारलं. वहिनीने हा सगळा प्रकार खूप गांभीर्याने घेतला आणि कुटुंबाला याची माहिती दिली. काही वेळातच नववधूच्या माहेरच्या मंडळींनी भेट घेतली आणि सासरच्या लोकांना हा सगळा प्रकार सांगितला. मुलगी लग्न होऊन घरी येताच हा सगळा प्रकार घडल्यामुळे माहेरच्यांनी कुटुंबाला जाब विचारायला सुरुवात केली. हे सगळं प्रकरण इतकं वाढलं, की गावातील लोकांना यामध्ये हस्तक्षेप करावा लागला. पंचायत बोलावण्यात आली. सुरुवातीला खूप गोंधळ झाला. नववधू आपल्या मतावर ठाम राहिली. वराने स्पष्टीकरण देताना सांगितले, की असे वागण्यामागे कोणतीही चुकीची भावना नव्हती.

दोन्ही बाजूंनी पंचायतीसमोर आपली आपली बाजू मांडली. अखेर नवऱ्याने आपली चूक मान्य करून नववधु आणि जवळच्या मंडळींकडे माफी मागितली. पंचायतीत सांगितलं की, यापुढे अशा पद्धतीचा कोणताही गैरव्यवहार होणार नाही. तेव्हा त्याने सांगितलं की, त्याला मित्रांनी चुकीचा सल्ला दिला आणि त्यानेही तो विचार न करता मान्य केला.



# नोकरी सोडून चहाची टपरी!

आजच्या धावपळीच्या जीवनात आणि मर्यादित पगाराच्या नोकरीत अनेक जण स्वत:चा व्यवसाय सुरू करण्याचे स्वप्न पाहतात; मात्र सुरक्षित नोकरी सोडून व्यवसायात उतरण्याचे धाडस फार कमी लोक करतात. अशाच एका तरुणाची प्रेरणादायी कथा सध्या 'सोशल मीडिया'वर मोठ्या प्रमाणात चर्चेत आहे. कॉर्पोरेट क्षेत्रातील नोकरी सोडून त्याने रस्त्याच्या कडेला चहाची टपरी सुरू केली आणि आज त्यातून तो महिन्याला लाखोंची उलाढाल करत आहे. 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्म 'एक्स'वर अंकित पांडे नावाच्या एका वापरकर्त्याने आपल्या शेजाऱ्याची ही कथा शेअर केली आहे. त्यानुसार, संबंधित तरुण एका कंपनीमध्ये काम करत होता. सकाळी नऊ ते संध्याकाळी पाच अशी नोकरी करून त्याला दरमहा सुमारे ३८ हजार रुपये पगार मिळत होता; मात्र मर्यादित पगारवाढ, करिअरमध्ये कमी संधी आणि वाढता खर्च यामुळे तो असमाधानी होता. त्यामुळे त्याने मे महिन्यात नोकरीचा राजीनामा देत स्वत:चा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला.

नोकरी सोडल्यानंतर संबंधित तरुणाने सुमारे दोन लाख रुपयांची गुंतवणूक करून एका ऑटो स्टँडजवळ आकर्षक चहाची टपरी सुरू केली. व्यवसाय सुरळीत चालावा यासाठी त्याने चहा बनवणे आणि ग्राहकांना सेवा देण्यासाठी दोन कर्मचाऱ्यांचीही नियुक्ती केली. त्याच्या टपरीवर साधा चहा दहा रुपयांना तर प्रीमियम चहा वीस रुपयांना विकला जातो. अंकितच्या पोस्टनुसार, या टपरीवर दररोज सुमारे चारशे कप चहा विकला जातो. त्यातून दररोज सुमारे सहा हजार रुपयांची विक्री होते. म्हणजेच महिन्याची एकूण उलाढाल जवळपास एक लाख ऐंशी हजार रुपयांपर्यंत पोहोचते.

# सरकारी योजनेच्या आमिषाने मुंडन!

ऑनलाइन फसवणुकीचे प्रकार दिवसेंदिवस अधिक धूर्त होत असताना तामिळनाडूमधील सालेम जिल्ह्यात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. सरकारी योजनेच्या नावाखाली १५ हजार रुपयांचे आमिष दाखवत एका भामट्याने तीन महिलांना डोके मुंडण करण्यास भाग पाडले. दुसऱ्या दिवशी कोणताही सरकारी अधिकारी न आल्याने आपण फसवणुकीचे बळी ठरलो असल्याचे महिलांच्या लक्षात आले. या प्रकरणाचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे. ही घटना सालेम जिल्ह्यातील अत्तूरजवळील पुथुकोथमपाडी गावातील आहे. गावातील पलानीअम्मल यांना रात्री सुमारे आठच्या सुमारास एका अनोळखी क्रमांकावरून फोन आला. फोन करणाऱ्या व्यक्तीने स्वत:ची ओळख अत्तूर तहसील कार्यालयातील तहसीलदार अशी करून दिली. विशेष म्हणजे त्या व्यक्तीला पलानीअम्मल तसेच त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची नावेही माहिती होती. त्यामुळे त्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला. भामट्याने फोनवर दावा केला, की कोरोनासारखा एक नवा संसर्गजन्य आजार पसरत असून तो केसांमधून पसरतो. या आजारापासून बचाव करण्यासाठी डोके मुंडन करणाऱ्या महिलांना तामिळनाडू सरकारकडून १५ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार असल्याचे त्याने सांगितले. तसेच शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनींना ४५ हजार रुपये आणि एक लॅपटॉप, तर पुरुषांना सहा हजार रुपये दिले जातील, असेही त्याने सांगितले. विश्वासार्हता निर्माण करण्यासाठी गावासाठी केवळ १८ टोकन उपलब्ध असून दुसऱ्या दिवशी दुपारी सरकारी अधिकारी गावात येऊन लाभार्थींना रक्कम वितरित करतील; मात्र त्यासाठी आधी डोके मुंडन केलेले असणे आवश्यक असल्याचेही त्याने सांगितले. ही माहिती गावात वेगाने पसरली आणि अनेकांनी ती खरी मानली. या अफवेनंतर गावातील सुमारे २० जणांनी मुंडन करण्याची तयारी केली. त्यापैकी ५६ वर्षीय कावेरी, ५८ वर्षीय रामायी आणि ६० वर्षीय चित्रा यांनी कोणतीही शंका न घेता डोके मुंडन करून घेतले; मात्र दुसऱ्या दिवशी गावात कोणताही सरकारी अधिकारी आला नाही. संबंधित क्रमांकावर पुन्हा संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता मोबाईल बंद असल्याचे आढळले.

त्यानंतर आपण फसवणुकीचे बळी ठरलो असल्याचे महिलांच्या लक्षात आले.





# अपघात रोखणारं स्मार्ट हेल्मेट

थंडीच्या दिवसात वातावरणात धुकं असतं. या धुक्यामुळे वाहनचालकांना समोरचं स्पष्ट दिसत नाही आणि अपघात होण्याचा धोका अनेक पटींनी वाढतो. म्हणूनच एक स्मार्ट हेल्मेट तयार करण्यात आलं आहे. हे हेल्मेट दुचाकी चालकांसाठी तयार करण्यात आलं असून ते घातल्यानंतर चालकांना सतत सूचना दिली जाईल. या हेल्मेटमध्ये अल्ट्रा सोनिक सेंसर्स बसवण्यात आले आहेत. या सेंसर्समुळे समोर एखादं वाहन किंवा वस्तू असल्यास चालकाला सूचना मिळेल. १४ मीटर अंतरावरूनच चालकाला सूचना दिली जाईल. हेल्मेटवरच्या एलसीडीवर अंतरही फ्लॅश होईल. आर्मी पब्लिक स्कूलच्या संकल्पसिंह भादौरियाने हे हेल्मेट तयार केलं असून याची किंमत फक्त एक हजार रूपये आहे. या हेल्मेटची प्रतिकृती एमईटी विद्यापीठातल्या स्काय आर्ट प्रदर्शनात सादर करण्यात आली होती. या हेल्मेटला ब्रिद ॲनलायझर सिस्टिमही जोडण्यात आली आहे. यामुळे मद्यपान करणाऱ्यांच्या शरीरातल्या अल्कोहोलचं प्रमाण मोजणंही शक्य होणार आहे. चालकाच्या शरीरात अल्कोहोलचं अधिक प्रमाण असल्यास हे हेल्मेट गाडीचं इंजिन बंद करून टाकेल. म्हणजे चालकाला गाडी चालवता येणार नाही आणि अपघात टळू शकेल.

# श्री शनैश्वर देवस्थानच्या कर्मचाऱ्यांचा संप प्रशासकांच्या आवाहनानंतर मागे

नगर - कर्मचाऱ्यांच्या संभाव्य आंदोलनामुळे श्री शनैश्वर देवस्थानमधील कोणतीही अत्यावश्यक सेवा, दर्शन व्यवस्था अथवा धार्मिक विधी बाधित होऊ नयेत यासाठी जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनाला आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त तथा प्रशासन डॉ.प्रवीण गेडाम यांनी दिले. कर्मचाऱ्यांच्या हिताबाबत प्रशासन सकारात्मक व संवेदनशील असून कायदेशीरदृष्टीने योग्य मागण्यांबाबत आवश्यक निर्णय घेण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी कामगार संघटना प्रतिनिधी, कार्यकारी अधिकारी व सर्व विभाग प्रमुखांसमवेत झालेल्या बैठकीत दिल्यानंतर कर्मचाऱ्यांनी संप मागे घेतल्याचे सांगितले.

डॉ.गेडाम म्हणाले, भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून देवस्थान व जिल्हा प्रशासनाच्या समन्वयातून युद्धपातळीवर पर्यायी व्यवस्था उभी करण्यात यावी. यामध्ये सुरक्षा व्यवस्था, स्वच्छता, गर्दी नियंत्रण, पाणीपुरवठा व आपत्कालीन व्यवस्थापन अखंडित ठेवण्यासाठी इतर शासकीय विभागांचे अधिकारी-कर्मचारी, स्थानिक महसूल यंत्रणा , पोलीस विभाग यांची मदत घेण्यात यावी. श्री शनिदेवांचे मुख्य दर्शन, महाप्रसाद व इतर आवश्यक व्यवस्था सुरळीत सुरू राहावी यासाठी पर्यायी मनुष्यबळाची नेमणूक करण्याचे नियोजन करावे, असे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले.

कर्मचाऱ्यांच्या नियमात बसणाऱ्या मागण्यांबाबत प्रशासन सकारात्मक असून त्यावर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, कर्मचाऱ्यांनीदेखील भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनासोबत समन्वयाची भूमीका घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण व जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे द्वारा विविध विभाग यांचे जवळपास १५० अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सेवा देवस्थानसाठी अधिग्रहीत करण्यात आलेल्या असून यामध्ये होमगार्ड , महसूल विभाग , ग्रामविकास विभाग याचे कडील कर्मचारी यांचा समावेश आहे.

वेतन श्रेणी प्राप्त कर्मचाऱ्यांच्या आरोग्य विम्यासंदर्भातील हप्ता भरण्याचे यापूर्वीच मान्य करण्यात आले तूर्त पूर्व विश्वस्त काळाप्रमाणे विमा व्यवस्था सुरू ठेवण्यात येईल. कर्मचाऱ्यांच्या सेवा व रजा नियमांचा प्रस्ताव मंजुरीसाठी शासन स्तरावर पाठविण्यात आलेला आहे. शासन निर्णय होईपर्यंत तूर्त इतर शासकीय आस्थापना प्रमाणे कर्मचाऱ्यांप्रमाणे रजा अनुज्ञेय असतील. कर्मचाऱ्यांचा थकीत दिवाळी बोनस, ५० टक्के वेतन फरक, अतिरिक्त कामाचा मेहनताना आणि कालबद्ध पदोन्नती या सर्व मागण्या देवस्थान कायदा कलम २७ शी संबधित असून त्यामध्ये व्यवस्थापन निधी बाबत १० टक्के रक्कम खर्च करण्याची तरतूद असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

'श्री शनैश्वर देवस्थान ट्रस्ट (शिंगणापूर) कायदा, २०१८' मधील कलम २७(२) नुसार व्यवस्थापन निधीसाठी देवस्थानच्या मागील वर्षाच्या एकूण वार्षिक उत्पन्नाच्या कमाल १० टक्के रकमेची वैधानिक मर्यादा घालण्यात आली असून त्यातूनच पगार व आस्थापना खर्च करणे बंधनकारक आहे. असे आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये एकूण उत्पन्न रु. ४८ कोटी २९ लक्ष असताना वेतन व बोनसवरील प्रत्यक्ष खर्च रु. २५ कोटी ८२ लक्ष (एकूण ५३.४६ टक्के), २०२५-२६ मध्ये एकूण उत्पन्न रु. ६१ कोटी ४५ लक्ष असतांना पगारावरील खर्च रु. १७ कोटी ४३ लक्ष म्हणजेच २८.३७ टक्के इतका झालेला आहे. याव्यतिरिक्त मासिक रु. ७ हजार ५०० प्रमाणे मानधन प्राप्त कर्मचाऱ्यांचे मानधन समाविष्ट केल्यास मासिक रु. ३५ लाख प्रमाणे अंदाजे रु. २ कोटी ४५ लाखांची भर पडून हा खर्च ३२.३६ टक्क्यापर्यंत पोहोचत असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. अधिकतम १० टक्के खर्चाची मर्यादा आणि प्रत्यक्ष होणारा खर्च व मा. सर्वोच्च न्यायालय प्रलंबित प्रकरणायाबाबत राज्य शासनाकडे सविस्तर माहिती सादर करण्यात आल्याचेही प्रशासनातर्फे सांगण्यात आले.

तत्कालीन पूर्व विश्वस्त कालावधी मध्ये मोठ्या प्रमाणात गैरप्रकार करण्यात आलेले होते त्यामुळे २२ सप्टेंबर २०२५ रोजी पूर्व विश्वस्त यांना बरखास्त करण्यात आले होते . त्यांच्या काळात घेण्यात आलेल्या अनेक निर्णयांमुळे अतिरिक्त भार निर्माण झाला आहे व त्यामुळे देवस्थान येथील कामकाज बाबत विविध अडचण असून त्यावर कायदेशीर मार्गाद्वारे समाधान करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मंदिर परिसर व वाहनतळ परिसरात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात असल्याची व भाविकांना असुविधा होऊ नये यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहितीही यावेळी देण्यात आली. एकूण वस्तूस्थिती लक्षात घेता देवस्थान कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असून त्यांनी भाविकांना त्रास होऊ नये यासाठी आंदोलनाचा मार्ग स्विकारू नये असे आवाहन डॉ.गेडाम यांनी केले.या आवाहनाला प्रतिसाद देत संबधित संघटनांनी सायंकाळी उशिरा दिलेल्या निवेदन नुसार सदरील काम बंद आंदोलनाबाबतचा निर्णय मागे घेण्यात आला.



## गुरुवाणी - ४५
### मी कोण आहे?

पर्युषण पर्वात आठ दिवस संपूर्ण परिवाराने बियासणा, एकासन करावे. भोजनाशिवाय आपण राहू शकत नाही हे सत्य नाही. तुम्ही शरीराचे गुलाम नाही आहात, भुकेचे गुलाम नाहीत. पर्युषण पर्व सांगते , 'तुम्हाला सिद्धी मार्गावर चालायचे तर स्वतःची मुलाखत घ्या'. मी कोण आहे? हा प्रश्न ज्याच्या मनात येतो त्याची यात्रा सुरू होते. आपल्या मनात प्रश्न जन्मतो, गुरू कोण आहे? भगवंत कोण आहे? हे प्रश्न तुम्हाला वेगळ्या यात्रेवर नेतात. म्हणून या पर्वात स्वतःलाच विचारा, 'मै कोण हू'? हा प्रश्न विचारला तरच धर्म, सामायिक, प्रतिक्रमण कळेल. इतर सगळ्या प्रश्नांची उत्तरे तुम्हाला संतांकडून किंवा इतरांकडून मिळतील. पण मी कोण आहे ? या प्रश्नाचे उत्तर फक्त आणि फक्त तुम्ही स्वतःच देऊ शकता. मी सुद्धा तुम्ही कोण आहात हे सांगू शकत नाही. ज्याला स्वतःला स्वतः कोण आहे हे कळलं तर त्याला सगळेच माहिती होईल. हा शोध आपल्या आतच करायचा आहे. हा विषय जटील आहे पण सर्वात महत्त्वाचा आहे. अर्जुन मालीला कोणताही आगम कंठस्थ नव्हता, पण त्याला तो स्वतः कोण आहे, हे कळले आणि त्याला सहा महिन्यात मोक्षप्राप्ती झाली. तुम्ही सुद्धा शोधले तर तुम्हाला या प्रश्नाचे उत्तर नक्की सापडेल. रावणाने साधूचा वेश करून सीतेचे अपहरण केले. नंतर सीता रावणाच्या कब्जात होती पण वश होत नव्हती. तेव्हा रावणाने रामाच्या रूपात सीतेसमोर जाण्याचा प्रयत्न केला. पण जेव्हा रावणाने रामाचे रुप घेण्यासाठी ध्यान लावले तेव्हा त्याचे मनच झाले नाही की परस्त्री कडे जावे. आपणही साधूला वेशभूषेवरून ओळखतो. त्याचे मूळ रूप जाणून घेण्याचा प्रयत्न करत नाही. मी कोण आहे ? हे महत्त्वाचे आहे. ज्याच्या मनात हा प्रश्न जन्मतो तोच अध्यात्माच्या मार्गावर जातो. जो सुख मिळण्यासाठी दीक्षा घेतो तो सुखी होतो पण आत्मसिद्ध कधीच होत नाही. माझे सत्य काय आहे हे कळलं पाहिजे. स्वतःला सतत हा प्रश्न विचारत राहा. हेच आहे स्वतःची मुलाखत स्वतः घेत राहणे. मगच मोक्षप्राप्तीचा रस्ता खुला होईल.

**- उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# शिक्षक, प्राध्यापक हे विद्यार्थ्यांच्या जीवनात बहुमोल कार्य करतात

## रवींद्र शिंगणापूरकर, सारडा महाविद्यालयाच्या आदर्श प्राचार्य पुरस्काराचे समारंभपूर्वक वितरण

नगर - नदी ज्या परिसरातून वाहते, त्या परिसरात ओलावा निर्माण करून तो सर्जनशील बनवते. त्याचप्रमाणे शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेले शिक्षक, प्राध्यापक हे ज्ञानाचे उगमस्थान आहेत. ते विद्यार्थ्यांच्या जीवनात ज्ञानाचा ओलावा निर्माण करण्याचे बहुमोल कार्य करतात. हा ज्ञानाचा ओलावा विद्यार्थ्यांच्या मनात जितका खोलवर रुजेल, तितका विद्यार्थी अधिक सर्जनशील बनेल. त्यामुळे शिक्षकांनी ज्ञानाचा हा ओलाव भरभरून पुढच्या पिढीला द्यावा, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रवींद्र शिंगणापूरकर यांनी केले.

पेमराज सारडा महाविद्यालयाच्या वतीने पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्राचार्यांना देण्यात येणाऱ्या 'स्व. प्राचार्य एस.एम. कुलकर्णी' आदर्श प्राचार्य पुरस्कार शिरूरच्या सी. टी. बोरा कॉलेज ऑफ आर्ट्‌स, कॉमर्स अँड सायन्सचे प्राचार्य डॉ. काकासाहेब मोहिते यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रवींद्र शिंगणापूरकर यांच्या हस्ते समारंभपूर्वक देण्यात आला. रुपये २५ हजार, मानपत्र व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष ॲड.अनंत फडणीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास परिक्षण समितीचे सदस्य डॉ. धोंडीराम पवार, संस्थेचे मानद सचिव सुमतीलाल कोठारी, कार्याध्यक्ष अनंत देसाई, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष मधुसूदन सारडा, जगदीश झालानी, प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, सौ..वैशाली मोहिते आदींसह सर्व प्राध्यापक व नागरिक उपस्थित होते.



पेमराज सारडा महाविद्यालयाच्या वतीने देण्यात येणारा 'स्व. प्राचार्य एस.एम. कुलकर्णी' आदर्श प्राचार्य पुरस्कार शिरूरचे प्राचार्य डॉ. काकासाहेब मोहिते यांना प्रदान करताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रवींद्र शिंगणापूरकर. समवेत हिंद सेवाचे अध्यक्ष ॲड.अनंत फडणीस, सचिव सुमतीलाल कोठारी, कार्याध्यक्ष अनंत देसाई, डॉ. धोंडीराम पवार, अजित बोरा, मधुसूदन सारडा, जगदीश झालानी, प्रचार्य डॉ.माहेश्वरी गावित आदी.

रवींद्र शिंगणापूरकर पुढे म्हणाले, स्वातंत्र्यपूर्व काळात देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे ध्येय समोर ठेवून समाजातील सर्व स्तरांनी योगदान दिले. त्याचप्रमाणे आता २०४७ पर्यंत विकसित भारताचे ध्येय साध्य करण्याची जबाबदारी आजच्या पिढीसमोर आहे. या ध्येयासाठी दिशाहीन होत चाललेल्या युवकांना प्रेरणा देण्याबरोबरच आपल्या वैभवशाली इतिहासाची ओळख करून देणे आवश्यक आहे. त्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घ्यावा. सारडा महाविद्यालयाचा आदर्श प्राचार्य पुरस्कार हा 'मी प्राध्यापक आहे' या जबाबदारीची जाणीव करून देणारा असून, शिक्षण क्षेत्रात अधिक जोमाने कार्य करण्यासाठी नवी ऊर्जा देणारा आहे.

ॲड.अनंत फडणीस म्हणाले, आजपर्यंत विद्यार्थ्यांना म्हणावा तसा देशाचा इतिहास शिकवायला गेला नाही. पण गेल्या काही वर्षांमध्ये यात बराच बदल झाला असून देशाचा वैभवशाली इतिहास, संस्कृती आता शाळा महाविद्यालयातून शिकवली जात असल्याने समाधान वाटते. बदलत्या काळात मोबाईलचे ५ जी, ६ जी असे कितीही व्हर्जन आले तरी शिक्षणाचे व गुरुजीचे महत्व कधीही कमी होणार नाही.

यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष अनंत देसाई यांनी आदर्श प्राचार्य पुरस्कारा मागील संकल्पना विशद केली. पुरस्कार्थी प्राचार्य डॉ. काकासाहेब मोहिते यांनी ज्या महाविद्यालयात शिकलो, घडलो त्याच सारडा महाविद्यालयाचा आदर्श प्राचार्य पुरस्कार मला मिळणे हे मोठे भाग्याचे असल्याचे सांगून थोडक्यात जीवनाचा यशस्वी प्रवास मांडला. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी सर्वांचे स्वागत केले. यावेळी सारडा महाविद्यालयाचे उपप्राचार्य मिलिंद देशपांडे व प्रा.गिरीश पाखरे, पर्यवेक्षक डॉ.सुजित कुमावत, प्रा.गिरीश कुलकर्णी,आदींसह सर्व प्राध्यापक उपस्थित होते. प्रा.प्रसाद बेडेकर यांनी सूत्रसंचालन केले तर समन्वयक डॉ. किरणकुमार साळवे यांनी आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# जैन बंधूभगिनींसाठी बाजारपेठेतच भोजन व्यवस्थेचा उपक्रम कौतुकास्पद

## आ.संगम जगताप यांचे प्रतिपादन

नगर - जैन धर्मात पर्युषणपर्व काळास खूप महत्व आहे. या काळात सूर्यास्तापूर्वी जेवणला फार महत्व आहे.महावीर चषक परिवाराने मुख्य बाजारपेठ असलेल्या मार्केटयार्डमध्ये जैन बंधूभगिनींसाठी भोजनाची उत्तम व्यवस्था करून पुंण्याचे व कौतुकास्पद काम केले आहे. महावीर चषक परिवाराचने सामाजिक जाणीवेतून राबवण्यात आलेल्या या उपक्रचा जैन समाजातील सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा. नगरमध्ये उपाध्याय पूजनीय प्रवीणऋषीजी महाराजांचा चातुर्मास सध्या सुरु आहे. यामुळे शहरात चांगले धार्मिक व सकारात्मक उर्जेचे वातवरण निर्माण झाले आहे, असे प्रतिसाद आ.संग्राम जगताप यांनी केले.



पर्युषण महापर्व काळानिमित्त मार्केटयार्ड येथे महावीर चषक परिवाराच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या चौविहार (ब्याळू) व्यवस्थेचा शुभारंभ प्रसंगी जैनमुनी अलोकऋषी महाराज. समवेत आ.संग्राम जगताप, श्रीगोपाल धूत, संजय चोपडा व राजेंद्र गांधी, राजेश भंडारी, संतोष गुगळे, नगरसेवक प्रकाश भागानगरे आदी.

## महावीर चषक परिवाराच्या पर्युषणपर्व काळातील भोजन व्यवस्थेचा शुभारंभ

जैन धर्मातील पवित्र 'पर्युषण महापर्व' काळास मंगळवार पासून सुरुवात झाली आहे. त्या निमित्त महावीर चषक परिवाराच्या वतीने मार्केटयार्ड येथे गंगाबिषण मणियार यांच्या कार्यालयात जैन समाजातील नागरिक, व्यापाऱ्यांची सायंकाळचे जेवण चौविहार (ब्याळू) ची व्यवस्था करण्यात आली आहे. या उपक्रमाचा शुभारंभ जैनमुनी अलोकऋषी महाराज यांनी आशीर्वादरुपी मंगळीक देऊन केला. यावेळी प्रमुख पाहुणे आ.संग्राम जगताप बोलत होते. यावेळी ज्येष्ठ उद्योजक श्रीगोपाल धूत, मर्चंट्स बँकेचे चेअरमन व महावीर चषक परिवाराचे संस्थापक संजय चोपडा व राजेंद्र गांधी, उद्योजक राजेश भंडारी, संतोष गुगळे, नगरसेवक प्रकाश भागानगरे यांच्यसह मोठ्या संख्यने मार्केटयार्ड मधील व्यापारी, जैन समजतील नागरिक उपस्थित होते.

प्रास्ताविकात संजय चोपडा म्हणाले, जैन धर्मात आत्मशांती, संयमासाठी पर्युषण महापर्वास खूप महत्व आहे. यामध्ये दररोज सायंकाळी सूर्यास्तापूर्वी भोजन घ्यावे लागते. मात्र नगरमध्ये बाहेर गावाहून आलेल्या व्यापाऱ्यांना तसेच बाजारपेठेतील दुकानदार व कर्मचाऱ्यांना घरी जाऊन भोजन घेणे शक्य नसते. यासाठी महावीर चषक परिवारातर्फे गेल्या ८ वर्षांपासून 'पर्युषण महापर्वा निमित्त चौविहार ब्याळूची व्यवस्था केली जात आहे. मार्केटयार्ड मधील गंगाबिषण मणियार यांच्या कार्यालयात दि.१४ सप्टेंबर पर्यंत ही व्यवस्था करण्यात आली आहे. दरवर्षी जैन समाजातील व्यापारी, नागरिक याचा मोठ्याप्रमाणात लाभ घेत आहेत. नगरमध्ये उपाध्याय पूजनीय प्रवीणऋषीजी महाराजांचा चातुर्मास सुरू आहे. त्यांच्याच प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली महावीर चषक परिवाराच्या वतीने हा सामाजिक उपक्रम राबवत आहोत.

राजेंद्र गांधी यांनी सर्वांचे आभार मानले. यावेळी मर्चंट असोसिएशनचे सचिव संतोष बोरा, मार्केट कमिटीचे संचालक राजेंद्र बोथरा, मर्चंट बँकेचे संचालक किशोर मुनोत व कमलेश भंडारी, मुख्य व्यवस्थापक नितीन भंडारी, अशोक भंडारी, प्रसाद गांधी, अजित बोरा, रवी शेलोत, संजय लोढा, अजय गुगळे, अनिल दुगड, राजेंद्र ताथेड, प्रसाद गांधी, मयूर पितळे, प्रीत पोखरणा, सिए आनंद गांधी, मयूर पितळे, प्रवीण शिंगी, प्रफुल मुथा, किरण पोखरणा, अतुल शेटीया, प्रतीक पोखरणा, धनराज संचेती, नरेंद्र बाफना, अमित पितळे, रुपेश भंडारी, विकास सुराणा, डॉ.आशिष भंडारी आदींसह व्यापारी व नागरिक उपस्थित.



जय आनंद महावीर युवक मंडळाच्या वतीने बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेतील ५६ शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

# जय आनंद महावीर युवक मंडळाच्या वतीने इचरजबाई फिरोदिया प्रशालेतील शिक्षकांचा सत्कार

## शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा जय आनंद महावीर युवक मंडळाचा उपक्रम कौतुकास्पद-राजेश भंडारी

नगर - आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाचे देणे लागतो.या भावनेने शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य अविरतपणे करीत आहे. आई-वडिलांबरोबरच विद्यार्थ्यांवर शिक्षक ही संस्कार करीत असतात. विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे.यासाठी बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेतील सर्व शिक्षक ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत आहेत.

माजी आमदार स्व.अरुण काका जगताप यांचे शहर विकासासाठी मोठे योगदान आहे.अहिल्यानगर शहर हे आपले गाव आहे.आपण आपल्या शहरासाठी योगदान द्यावे.असे स्व.अरुणकाका जगताप यांच्या प्रेरणेमुळेच मी अहिल्यानगर शहरात उद्योग व्यवसाय करण्याचे ठरविले आहे.तसेच आमदार संग्राम जगताप यांचेही वेळोवेळी मार्गदर्शन लाभत असल्याने शहर विकासासाठी चांगले काम करावे.यासाठी ऊर्जा मिळत असते.

मी पारनेर येथील सेनापती बापट या शाळेतील माजी विद्यार्थी असल्याने मी या संस्थेत घडलो आहे. विद्यार्थ्यांना शिस्त, शिक्षण व संस्कार देणारी ही शाळा आहे.जय आनंद महावीर युवक मंडळ सामाजिक कार्यात अग्रेसर आहे. शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा जय आनंद महावीर युवक मंडळाचा उपक्रम कौतुकास्पद आहे.असे प्रतिपादन प्रसिद्ध उद्योजक व महावीर ग्रुपचे संचालक राजेश भंडारी यांनी केले आहे.

नवी पेठ येथील अ.ए.सोसायटीचे बाई इचरजबाई प्रशालेतील शिक्षक दिनानिमित्त जय आनंद महावीर युवक मंडळाच्या वतीने सर्व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रसिद्ध उद्योजक व महावीर ग्रुपचे संचालक राजेश भंडारी,जय आनंद महावीर युवक मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत, मुख्याध्यापिका ज्योती सिसोदिया,मंडळाचे कार्याध्यक्ष सत्येन मुथा, सचिव आनंद मुथा,नितीन मुनोत,प्रमोद गांधी आदींसह शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शैलेश मुनोत प्रास्ताविकात म्हणाले, जय आनंद महावीर मंडळाच्या वतीने गेल्या ३८ वर्षापासून बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेतील शिक्षकांचा शिक्षक दिनानिमित्त सत्कार करण्यात येत आहे.मी देखील या शाळेचा माजी विद्यार्थी आहे. या शाळेतील हजारो विद्यार्थी मोठ्या हुद्द्यांवर कार्यरत आहेत.सर्व क्षेत्रात विद्यार्थ्यांनी प्रगती केली आहे.या शाळेतील सर्व शिक्षक विद्यार्थ्यांना उत्कृष्ट ज्ञानदानाचे कार्य करीत असल्याने येथील विद्यार्थी घडले आहेत.जय आनंद महावीर युवक मंडळावर फिरोदिया परिवाराचे विशेष प्रेम आहे.फिरोदिया कुटुंबातील छायाताई फिरोदिया,नरेंद्र फिरोदिया तसेच स्वर्गीय अशोकभाऊ फिरोदिया व शांतीभाऊ फिरोदिया यांनी देखील मंडळाला अनमोल मार्गदर्शन केले आहे.वर्षभर मंडळाच्या उपक्रमात शिक्षकांचा सहभाग लाभत असतो.नवीन पिढी घडविण्यासाठी शिक्षकांचे कार्य अनमोल आहे.

मुख्याध्यापिका ज्योती सिसोदिया म्हणाले, जय आनंद महावीर युवक मंडळ सामाजिक,धार्मिक व शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रात मोलाचे योगदान देत असते.सामाजिक बांधिलकीतून दरवर्षी शिक्षक दिनानिमित्त शाळेतील शिक्षकांचा सत्कार करण्यात येतो.सर्व शिक्षकांचा सत्कार केल्याबद्दल शाळा व संस्थेचे वतीने मंडळाचे आभार मानते.

शाळेतील शिक्षक वैभव वाघ यांना काका ट्रस्टचे वतीने आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले.त्यांचा जय आनंद महावीर युवक मंडळाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. शाळेतील विद्यार्थी आयुष थोरवे व ओजस्वी ढगे यांनी शिक्षकांप्रती मनोगत व्यक्त केले.

बाळु कोटकर यांनी यादी वाचन केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय विशाल तांदळे यांनी करून दिला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.कांचन नेहुल व कांतीलाल खुरंगे यांनी केले. तर आभार आनंद मुथा यांनी मानले.

# सबलोक प्राथमिक विद्यालयात 'प्रतिरूप विद्यालय' उपक्रम

## विद्यार्थ्यांनी अनुभवले शिक्षक आणि मुख्याध्यापकांचे कामकाज

नगर - शिक्षक दिन हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक अत्यंत महत्त्वाचा व आनंदाचा दिवस मानला जातो. याच औचित्य साधून शहरातील गांधी मैदान परिसरातील मनोहरलाल रामचंद सबलोक प्राथमिक विद्यालयात 'प्रतिरूप विद्यालय' हा अतिशय अभिनव व प्रेरणादायी उपक्रम नुकताच अत्यंत उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष शिक्षकांच्या भूमिका साकारत विद्यालयाचा संपूर्ण कारभार हाकला.

'प्रतिरूप विद्यालय' उपक्रमांतर्गत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका अत्यंत उत्स्फूर्तपणे व जबाबदारीने पार पाडली. विद्यार्थ्यांनी केवळ वर्गात जाऊन अध्यापनच केले नाही, तर शिस्त राखणे, शैक्षणिक तासांचे नियोजन करणे, वेळेचे तंतोतंत पालन करणे आणि एका शिक्षकावर असणाऱ्या दैनंदिन जबाबदाऱ्या किती मोठ्या असतात, याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. या उपक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे काही होतकरू विद्यार्थ्यांनी विद्यालयाचे मुख्याध्यापक, इतर शिक्षक तसेच कार्यालयातील विविध शालेय जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळल्या. यामुळे विद्यार्थ्यांना शाळा व्यवस्थापनाचे कामकाज कशा पद्धतीने चालते, याची सखोल माहिती मिळाली.



मनोहरलाल रामचंद सबलोक प्राथमिक विद्यालयात 'प्रतिरूप विद्यालय' हा अतिशय अभिनव व प्रेरणादायी उपक्रम नुकताच अत्यंत उत्साहात राबविण्यात आला.

प्रत्यक्ष वर्गात उभे राहून विद्यार्थ्यांना शिकवल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर होऊन त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, उत्तम नेतृत्वगुण, वक्तृत्वकौशल्य आणि कर्तव्याची जाणीव यांसारख्या गुणांचा विकास झाला. एका दिवसासाठी का असेना, पण विद्यार्थ्यांनी शिक्षक बनून अनुभवल्या गेलेल्या या भूमिकेमुळे त्यांच्यात शिक्षकांप्रति आदरभाव आणखी दृढ झाला. उपक्रमाच्या यशस्वीतेनंतर विद्यालयातील गुरुजनांनी सर्व विद्यार्थी-शिक्षकांचे मनःपूर्वक कौतुक केले तसेच त्यांना भविष्यासाठी बहुमूल्य मार्गदर्शन व शुभेच्छा दिल्या. संपूर्ण दिनभर विद्यालयाचे वातावरण आनंदी, खेळीमेळीचे आणि विलक्षण उत्साहाने भारलेले होते.

हा नाविन्यपूर्ण उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. नराल मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. लबडे सर, श्री. जावळे सर, श्री. कदम सर, श्री. चौरे सर, सौ. भोर मॅडम, उकिरडे मॅडम, गायकवाड मॅडम, सौ. कोकुल मॅडम, सौ. त्रिमुखे मॅडम तसेच सौ. येनगंटी मावशी यांनी विशेष परिश्रम घेतले. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या स्मरणात राहील असा अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.

